पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

• वर्ष १६ • अंक ३८ • गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

सुविचार

माणसाने आयुष्य जगतांना मिठासारखं जगावं... महाग नसावं पण महत्वाचं असावं..

सिटी न्यूज सुपरफास्ट

बार्शिटाकळी शहरात

अंक मिळण्यासाठी व जाहिरातींसाठी

संपर्क

आजम खान

तालुका प्रतिनिधी

+91 7875280943

## » थोडक्यात

### राज्यात आजपासून तीन दिवस मुसळधार

**मुंबई :** राज्यभरात क्षणभर विश्रांती घेतल्यानंतर पावसाने पुन्हा एकदा हजेरी लावायला सुरुवात केली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने कोकण आणि विदर्भासह मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी आणि मराठवाड्यात काही ठिकाणी गुरुवारी पावसाचा अंदाज वर्तविला आहे. तर दुसरीकडे मुंबईच्या पश्चिम उपनगरात सकाळपासूनच मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार १३, १४ आणि १५ ऑगस्ट या तीन दिवसांत महाराष्ट्रातील विविध भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

---

### न्यायमूर्ती यशवंत वर्मांवरील आरोप संसदीय समितीकडून सिद्ध

**नवी दिल्ली :** संसदीय चौकशी समितीने न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरील तिन्ही आरोप खरे असल्याचे सिद्ध केले आहे. हे प्रकरण २०२५ मध्ये न्यायमूर्ती वर्मा यांच्या शासकीय निवासस्थानातील कोठारात रोकड सापडल्याच्या घटनेशी संबंधित आहे. समितीचा अहवाल बुधवार, १२ ऑगस्ट रोजी लोकसभा आणि राज्यसभेत सादर करण्यात आला. न्यायमूर्ती वर्मा या रोकडचा स्रोत, मालकी किंवा अस्तित्वाबद्दल समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. न्यायमूर्ती वर्मा यांनी या वर्षी एप्रिलमध्ये उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचा राजीनामा दिला.

---

### नवी मुंबईत साकारलं जाणार 'विदर्भ भवन'!

नागपूर : नवी मुंबईतील खारघर-पनवेल परिसरात वास्तव्यास असलेल्या विदर्भातील नागरिकांसाठी ‘ विदर्भ भवन ’ उभारण्याच्या प्रस्तावाला आता गती मिळाली आहे. खारघर येथे उपलब्ध असलेल्या दोन एकर जागेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रायगडचे जिल्हाधिकारी आणि सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिले. आमदार दटके यांच्या पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय झाला आहे. विदर्भातील मोठ्या संख्येने कुटुंबे वास्तव्यास आहेत. या नागरिकांना सामाजिक, हक्काचे केंद्र उपलब्ध व्हावे, तसेच विदर्भातून नवी मुंबईत येणाऱ्या नागरिकांना तात्पुरत्या स्वरूपात विविध सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने ‘विदर्भ भवन’ उभारण्याची मागणी करण्यात आली होती.

# संसद अनिश्चित काळासाठी तहकूब!



## पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले; शेवटच्या दिवशी लोकसभा १ मिनिट, तर राज्यसभा १ तास चालली

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी गुरुवारी लोकसभेचे कामकाज अवघे एक मिनिट चालले. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी वंदे मातरम गायन करवून घेतले आणि त्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आले. लोकसभेत मोदी-शहा यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळ आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी देखील उपस्थित होते.

सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षाच्या खासदारांनी आजही संसद परिसरात निदर्शने केली. २० जुलैपासून सुरू झालेल्या अधिवेशनात विरोधक नीट पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईवरून सातत्याने गदारोळ करत आहेत.

दरम्यान, राज्यसभेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी उत्तराखंडमधील हल्द्वानी येथे त्यांच्या कार्यक्रमानंतर झालेल्या शुद्धीकरणाचा मुद्दा उपस्थित केला. एमएमडीआर दुरुस्ती विधेयक सभागृहात मंजूर करण्यात आले. त्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले. विरोधी पक्षाचे खासदार माकडाचे खेळणे घेऊन संसद परिसरात पोहोचले आणि घोषणा दिल्या. विरोधी पक्षाचे खासदार माकडाचे खेळणे घेऊन संसद परिसरात पोहोचले आणि घोषणा दिल्या. संसद परिसरात गुरुवारी विरोध प्रदर्शनादरम्यान सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षाचे खासदार आमनेसामने आले.



### खरगे म्हणाले, मी निघून गेल्यानंतर शुद्धीकरण!

राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, 'मी हल्द्वानीमध्ये होतो, जिथे मी रामलीला मैदानावर एका जाहीर सभेला संबोधित केले. तिथे लाखो लोक उपस्थित होते. मी कोणत्याही समुदायाचा किंवा धर्माचा उल्लेख केला नाही, केवळ सरकारच्या मुद्द्यांचा पुनरुच्चार केला. मात्र, माझ्या भाषणानंतर भाजप सदस्यांनी व्यासपीठ 'शुद्ध' करण्यासाठी हवन केले.'

### आपण सर्वजण पवित्र आहोत- अध्यक्ष राधाकृष्णन

मल्लीकार्जुन खरगे यांच्या शुद्धीकरणाच्या मुद्यावर अध्यक्ष राधाकृष्णन म्हणाले, 'अस्पृश्यता नावाची कोणतीही गोष्ट नसावी. ते एक पाप आहे. आपण सर्वजण पवित्र आहोत. या प्रकरणाची चौकशी करून दोषींना शिक्षा झाली पाहिजे, असे मत त्यांनी पावसाळी अधिवेशनात शेवटच्या दिवशी व्यक्त केले.

### गत वर्षी चालले होते ३७ तास काम

२०२६ लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनाचे सूप गुरूवारी वाजले. यावेळी सुमारे ९६ तास ३० मिनिटे कमी कामकाज झाले. तर, २०२५ चे पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट २०२५ पर्यंत चालले होते. यात लोकसभा आणि राज्यसभेच्या प्रत्येकी २१ बैठका झाल्या. लोकसभेत फक्त ३७ तास काम झाले होते.

### लोकसभेत ११४ तासांपैकी ९६ तास काम झाले नाही

पावसाळी अधिवेशनात लोकसभेच्या १९ बैठका झाल्या. सभागृहाची सामान्य बैठक सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत असते. दुपारी १ ते २ वाजेपर्यंत दुपारच्या जेवणाची सुट्टी असते. म्हणजे एका दिवसात सुमारे ६ तास कामकाज चालते. या हिशोबाने १९ बैठकांमध्ये सुमारे ११४ तास कामकाज होणे अपेक्षित होते, परंतु ते सुमारे १७ तास ३० मिनिटेच चालले. म्हणजे सुमारे ९६ तास ३० मिनिटे कमी कामकाज झाले.

### भाजप हल्द्वानी शुद्धीकरण घटनेला पाठिंबा देत नाही

राज्यसभेचे नेते आणि केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा म्हणाले, 'खरगेजी जे म्हणाले ते अत्यंत दुःखद आहे. ही केवळ काँग्रेससाठीच नव्हे, तर आपल्या सर्वांसाठी दुःखाची बाब आहे. भाजप अशा कारवायांना पाठिंबा देत नाही. कधीही नाही. पण आम्ही याची चौकशी करू. मी तुम्हाला खात्री देतो की तिथे जे काही घडले त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.'

# विद्यापीठ प्रशासनाची संशयास्पद भूमिका!





प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोला / नागपूर :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील प्रशासकीय कारभार आणि आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण आता अत्यंत गंभीर वळणावर पोहोचले आहे. विद्यापीठातील लाखो रुपयांच्या आर्थिक घोळ प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने विद्यापीठ वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

आज विद्यापीठाचे काही अधिकारी एम आय डी सी पोलिस स्टेशनला उपस्थित झाले होते. एकीकडे पोलीस प्रशासनाकडून गुन्हे दाखल करण्याची तयारी सुरू असताना, दुसरीकडे विद्यापीठाचे कुलगुरू ज्या अधिकाऱ्याच्या विरोधात प्रशासनाला पोलिसात तक्रार दाखल करण्याचा लेखी आदेश देतात त्यालाच सोबत घेऊन पूर्व विदर्भाच्या दौऱ्यावर फिरत असल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लाखो रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी विद्यापीठ प्रशासनाच्या पूर्वपरवानगीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू झाली आहे. पोलीस लवकरच याप्रकरणी अधिकृत गुन्हा दाखल करणार आहेत. मात्र, या सर्व घडामोडींनंतरही वादग्रस्त अधिकारी डॉ. श्यामसुंदर माने हे कुलगुरूंसोबत नागपूर विभागाच्या दौऱ्यावर मुक्तपणे वावरत असल्याचे समोर आले आहे. कुलगुरू डॉ. गडाख आणि डॉ. पुरी यांच्या कमिटीसोबत डॉ. माने विविध कार्यक्रमांत सहभागी होत असल्याने प्रशासकीय पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### ज्युनिअर ऑफिसर MIDC पोलिसांसमोर वरिष्ठ कुलगुरुंच्या सोबत



सध्या कुलगुरूंच्या आदेशानुसार डॉ. पुरी यांच्या अध्यक्षतेखाली आणि सदस्य सचिव डॉ. कोष्टी यांच्या अभ्यासू नियोजनाखाली विद्यापीठाचे 'थर्ड पार्टी इव्हॅल्युएशन' (तृतीय पक्ष मूल्यांकन) सुरू आहे. या प्रक्रियेची पहिली सभा अकोल्यात झाली असून, दुसरी सभा ११ ते १४ ऑगस्टदरम्यान नागपूर येथे पार पडली.

परंतु, ज्या 'थर्ड पार्टी'ने डॉ. माने यांच्या प्रकरणांची सखोल तपासणी करणे अपेक्षित होते, तीच कमिटी आणि कुलगुरू आरोपी अधिकाऱ्याला सोबत घेऊन फिरत आहेत. त्यामुळे या संपूर्ण मूल्यांकन प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या मूल्यांकनाच्या नावाखाली विद्यापीठाचे लाखो रुपये खर्च केले जात आहेत, मात्र यातून विद्यापीठाला कोणताही ठोस प्रशासकीय किंवा शैक्षणिक फायदा होताना दिसत नाही. कुलगुरूंच्या मर्जीतील आणि जवळच्या लोकांनाच या मूल्यांकनाचे कंत्राट देण्यात आल्याचा गंभीर आरोपही केला जात आहे. तशी चर्चा विद्यापीठात सुरु आहे. त्यामुळे हा सर्व प्रकार म्हणजे केवळ शासकीय निधीची उधळपट्टी असल्याचा घणाघाती आरोप विविध स्तरातून होत आहे.

# 10 लाखांच्या बदल्यात 30 लाखांच्या बनावट नोटा!

## नाशिकमध्ये मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश, पाच आरोपींना अटक

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**नाशिक :** नाशिक-त्र्यंबकेश्वर रोडवर बनावट नोटा छापणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा नाशिक ग्रामीण आणि शहर पोलीस दलाने संयुक्तिक कारवाई करत पर्दाफाश केला आहे. तळेगाव येथील एका बंगल्यामध्ये छुप्या पद्धतीने सुरू असलेला बनावट नोटांचा कारखाना पोलिसांनी उद्ध्वस्त केला असून, घटनास्थळावरून लाखो रुपयांच्या बनावट नोटांसह छपाईचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

या प्रकरणात पोलिसांच्या पथकाने तब्बल पाच आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. नाशिक ग्रामीण



विभागाचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली ही मोठी कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारखान्यात अत्यंत वेगळ्या क्लृप्तीचा वापर करून बनावट नोटा तयार केल्या जात होत्या. खऱ्या चलनी नोटा एका विशिष्ट केमिकलमध्ये बुडवून, त्या नोटांची शाई दुसऱ्या कागदावर वटवून हुबेहूब दिसणाऱ्या बनावट नोटा तयार केल्या जात होत्या.

या रॅकेटमधील आरोपी १० लाख रुपयांच्या खऱ्या चलनी नोटांच्या बदल्यात ३० लाख रुपयांच्या बनावट नोटा देण्याचे आमिष दाखवून व्यवहार करत होते. असाच एक व्यवहार सुरू असताना पोलिसांनी सापळा रचून धाड टाकली. याप्रकरणी नाशिक ग्रामीण पोलिसांनी त्वरित कारवाई करत ५ जणांना अटक केली आहे. यामध्ये अमरेश्वर आईथा (तेलंगणा), दासरी सत्यइ (तेलंगणा), गोकुळ दाते (तळेगाव, नाशिक), हिरामण दाते (तळेगाव, नाशिक), मच्छिंद्र घनदाट (सातपूर, नाशिक), अशी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

# कावड यात्रेपूर्वी अकोल्यातील पथदिवे सुरु करा

## ३ दिवसांत वीज न दिल्यास आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोला :** श्रावण महिन्यास सुरुवात झाली असून अकोला शहरातून अकोटकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरून हजारो शिवभक्तांची कावड यात्रा लवकरच निघणार आहे. मात्र, हनुमान चौक ते तीन खांबे या मुख्य कावड मार्गावर दोन वर्षांपासून पोल अन् दिवे बसवूनही केवळ ‘मीटर’ नसल्याने अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. कावड यात्रेकरूंच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता पुढील तीन दिवसांत या मार्गावरील पथदिवे सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीचे गटनेते तथा नगरसेवक निलेश रामकृष्ण `व यांनी दिला आहे. अकोला-अकोट राष्ट्रीय महामार्ग हा दरवर्षीच्या कावड यात्रेचा प्रमुख मार्ग आहे. निलेश देव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाने दुभाजकांमध्ये वीज पोल उभारून पथदिवे बसविले. ७ जुलै २०२५ रोजी दिलेल्या पत्रात महामार्ग प्राधिकरणाने काम पूर्ण झाल्याचे सांगून पथदिवे अकोला पालिकेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे स्पष्ट केले होते. १६ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीतही यावर चर्चा झाली. मात्र, राष्ट्रीय महामार्ग विभाग, महापालिका आणि महावितरण यांच्यातील समन्वयाअभावी आणि केवळ वीज मीटर न बसल्यामुळे ही व्यवस्था धूळ खात पडून आहे.प्रशासकीय दिरंगाईवर सवालरात्रीच्या वेळी कावड घेऊन पायी जाणाऱ्या हजारो भाविकांना अंधारामुळे वाहनांची धडक, अपघात व भटक्या जनावरांचा मोठा धोका निर्माण होऊ शकतो. सर्व पायाभूत सुविधा तयार असताना केवळ मीटर जोडणीसाठी एवढा विलंब का, असा सवाल निलेश देव यांनी उपस्थित केला आहे.प्रमुख मागण्या:जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने महामार्ग विभाग, पालिका व महावितरणची संयुक्त बैठक घ्यावी.मीटर व वीज जोडणीतील प्रशासकीय अडथळे तात्काळ दूर करावेत. कावड यात्रा सुरू होण्यापूर्वी संपूर्ण मार्ग प्रकाशमान करावा. प्रशासनाने तात्काळ कारवाई करून येत्या तीन दिवसांत पथदिवे सुरू न केल्यास शिवभक्तांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

# बॉक्सिंगच्या रिंगणात दणदणीत डंका!

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

## 'फायटर किंग' नीरज सिंग



**अकोला :** पुण्यातील प्रतिष्ठित 'ब्ल्यू मार्टिनीज'येथे आयोजित 'सायको बॉक्सिंग प्रमोशन' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धेत अकोल्याच्या नीरज सिंग ठाकूर याने आपल्या तुफानी कामगिरीने ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. आपल्या दमदार पंचेस आणि उत्कृष्ट मैदानी कौशल्याच्या जोरावर नीरजने प्रतिस्पर्ध्याला निष्प्रभ करत अकोल्याची मान आंतरराष्ट्रीय क्रीडा जगतात अभिमानाने उंचावली. या अत्यंत चुरशीच्या सामन्यात नीरजने पहिल्याच राऊंडपासून आपली पकड मजबूत ठेवली. प्रत्येक राऊंडमध्ये ३५ ते ४० गुणांची घसघशीत आघाडी घेत त्याने पूर्ण रिंग गाजवली. त्याच्या या आक्रमक आणि कौशल्याने नटलेल्या खेळापुढे पंचांनाही कौतुक केले आणि त्यांनी एकमुखाने नीरजला विजयी घोषित केले. नीरजच्या या चमकदार यशाने संपूर्ण अकोला जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. अकोल्यातील क्रीडाप्रेमी आणि स्थानिकांकडून नीरज सिंग ठाकूरवर कौतुकाचा वर्षाव होत असून, खेळाडूंना प्रोत्साहन देणाऱ्या आर.आर.सी. न्यूज आणि पंकज देशमुख यांचेही सर्व स्तरातून विशेष आभार मानले जात आहेत. नीरजचा हा विजय अकोल्यातील अनेक नवोदित खेळाडूंसाठी एक मोठी प्रेरणा ठरणार आहे.

### आर.आर.सी. न्यूज आणि संचालक पंकज देशमुख यांचे मोलाचे योगदान

» कोणत्याही खेळाडूच्या यशामागे कष्टासोबतच योग्य पाठबळ असणे अत्यंत गरजेचे असते. नीरजच्या या प्रवासात 'आर.आर.सी. न्यूज' आणि त्याचे संचालक पंकज देशमुख हे खऱ्या अर्थाने देवदूत ठरले. नीरजचा प्रवास, निवास, भोजन, बॉक्सिंग किट आणि स्पर्धेची एन्ट्री फी या सर्व आर्थिक बाबींची जबाबदारी पंकज देशमुख यांनी पूर्णपणे स्वतःवर घेतली. या भक्कम पाठबळामुळे नीरजला आर्थिक चिंता बाजूला ठेवून केवळ आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करता आले. क्रीडापटूंना व्यासपीठ आणि ताकद मिळवून देण्याचे एक उत्तम उदाहरण या निमित्ताने आर.आर.सी. न्यूज आणि पंकज देशमुख यांनी घालून दिले आहे.

# मनपात होणार होती सत्ता बदल

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

## व्हॅलिडिटी समितीवर दबाव कोणाचा मराठा केले ओबीसी ?

**अकोला :** कास्ट व्हॅलिडिटी समितीवर दबाव आणून महापालिकेतील सत्ता वाचविण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. ओबीसी की पाटील असा प्रश्न आल्यावर ओबीसी सर्टिफिकेट देत कास्ट व्हॅलिडीटी प्रमाणपत्र नगरसेवकांना देण्यात आल्याची माहिती आहे. तीन नगरसेविकांच्या प्रकरणात जातवैधता समिती अडचणीत आली आहे.

दत्तक विधानाच्या आधारे कास्ट व्हॅलिडिटी देणारे अकोला हे एकमेव कार्यालय ठरले असून अकोला जात वैधता समितीची चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे. सत्तापक्षाच्या



तीन महिला नगरसेविकांची कास्ट व्हॅलिडिटी ची चौकशी करण्याची मागणी होत असून या प्रकरणात उच्च स्तरीय चौकशीची झाल्यास मोठी अडचण अधिकाऱ्यांची होणार आहे. मराठा, पाटील समाजातील महिला नगरसेविकांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे तोंडी आदेश कोणी दिले असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर या माध्यमातून ओबीसींवर अन्याय झाल्याची ओरड आहे. महापालिका निवडणूकीत नामांकन अर्ज दाखल करताना अर्ज दाखल करण्याची वेळ निघून गेल्यावर काहींचे अर्ज घेतले गेले. त्यापैकी या नगरसेविका असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

## एक महिना चहा बंद केल्याने होऊ शकतात अनेक फायदे

मुंबई : आपल्यापैकी बरेच लोक दिवसाची सुरुवात एक कप गरमागरम चहाने करतात. चहाची चव इतकी आवडते की, अनेकांना दिवसातून अनेक कप चहा पिण्याची सवय असते. पण तुम्हाला माहित आहे का, चहाचे जास्त सेवन आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकते.

**स्ट्रेस कमी करण्यासाठी चहा? :** अनेकदा आपण स्ट्रेस कमी करण्यासाठी चहा पितो. पण चहामध्ये असलेले कॅफिन हे तत्व आपल्याला अधिक चिंताग्रस्त बनवू शकते. त्यामुळे झोप येण्यास अडचण येते आणि आपण अधिक थकलेले वाटतो. एक महिना चहा बंद केल्याने, आपला स्ट्रेस लेव्हल कमी होण्यास मदत मिळू शकते.

# मुक्त विद्यापीठाच्या परीक्षेत अनागोंदी कारभार?

## एकाच वेळी, एकाच दिवशी अनेक विद्यार्थी दोन परीक्षांना हजर!

विद्यापीठ अनुदान आयोगाने एप्रिल २०२२ मध्ये विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन शैक्षणिक कार्यक्रम करण्याची परवानगी दिली होती. एप्रिल २०२५ मध्ये याचा विस्तार करून एक व्यापक दुहेरी पदवी चौकट तयार करण्यात आली. आता विद्यार्थी एकाच वेळी दोन पदव्या,एक पूर्णवेळ प्रत्यक्ष पध्दतीने व दुसरी मुक्त व दुरस्थ शिक्षण/ऑनलाइन पद्धतीने किंवा एकाचवेळी जास्तीत जास्त दोन मुक्त व दुरस्थ शिक्षण/ऑनलाइन पद्धतीने मिळवू शकतो. मात्र अट ही आहे की वर्गांच्या वेळा वेगवेगळ्या असाव्यात. हा नियम पीएच. डी. किंवा एम.फिल. कार्यक्रमांना लागू होत नाही.त्यामुळे विद्यार्थी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एकाचवेळी दोन वेगवेगळ्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात, असे मत आहे.

मागील दोन वर्षांपासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे या ना त्या कारणांसाठी चर्चेत असतानाच उन्हाळी २०२६ परीक्षेबाबत विद्यापीठाचा भोंगळ कारभार उघडकीस आला आहे.विद्यार्थ्यांना मुक्त विद्यापीठात दुहेरी पदवीची मुभा आहे,हे लक्षात ठेऊन, परीक्षा विभागाने परीक्षेंचे वेळापत्रक बनविणे अत्यावश्यक होते.माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात परीक्षा घेण्यापूर्वी विद्यापीठाकडे किती विद्यार्थी कोणकोणत्या अभ्यासक्रमात प्रवेशित आहे याची इत्यंभूत माहिती असते.त्याचप्रमाणे कोणकोणत्या विद्यार्थ्यांनी, एकाच वेळी, दोन अभ्यासक्रमात प्रवेश घेतला हे पण माहित असते. विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर परीक्षेचे वेळापत्रक तयार करतेवेळी एकाच वेळी दोन अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा एकाच दिवशी एकाच वेळी येणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे.पण तसे न करता एकाच दिवशी एकाच वेळी दोन अभ्यासक्रमांच्या विषयांच्या परीक्षा ठेवण्यात आल्या. त्यामुळे जवळपास विविध अभ्यासक्रमांच्या १५३ विषयांत अनेक विद्यार्थी एकाच दिवशी व एकाच वेळी परीक्षेला बसले. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना एकाच अभ्यासक्रमाचा पेपर सोडवता आला व दुसऱ्या अभ्यासक्रमाचा पेपर त्यांना सोडवता आला नाही. पण अशा परिस्थितीत,विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून, अशा विद्यार्थ्यांसाठी, ज्यांच्या दोन अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षेंचा पेपर एकाच दिवशी एकाच वेळी आला, त्यांनी एका अभ्यासक्रमाची परीक्षा नियमित वेळापत्रकानुसार दिल्यानंतर व दुसऱ्या अभ्यासक्रमाची परीक्षा विद्यापीठ नंतर घेणार असे विद्यापीठाने आपल्या संकेतस्थळावर जाहीर केले आहे.

परंतु विद्यापीठाच्या गलथान कारभाराचा फायदा घेत,यातील काही विद्यार्थांनी, वेगवेगळ्या अभ्यासक्रमातील दोन विषयांची परीक्षा एकाच दिवशी,एकाच वेळी देण्याचा 'पराक्रम' केला. त्यात एकाच दिवशी एकाच वेळी एक पेपर एम.ए.(मराठी)चा तर दुसरा पेपर एम.ए.(इंग्रजी)चा, किंवा एक पेपर बी.एस. सी.चा व दुसरा बी.ए.चा,किंवा एक पेपर एम.एस.सी.(वनस्पती शास्त्र)चा,तर दुसरा पेपर एम.ए.(इंग्रजी)चा किंवा एक पेपर पत्रकारिता आणि जनसंवाद विषयातील बॅचलर ऑफ आर्ट्स आणि दुसरा पेपर एम.ए. (अर्थशास्त्र)चा असे अनेक अभ्यासक्रमांच्या विषयांमध्ये एकाच दिवशी एकाच वेळी विद्यार्थी उपस्थित असल्याचे आढळून आले.आता या विद्यार्थ्यांचे दोन्ही अभ्यासक्रमांचे सीट नंबर वेगवेगळे आहेत. तरी एकाच दिवशी एकाच वेळी असलेल्या परीक्षेला दोन सीट नंबरवर एकच विद्यार्थी कसा बसला? एवढेच नव्हे तर काही विद्यार्थी वेगवेगळ्या परीक्षा केंद्रामधून आणि आणि काही विद्यार्थी तर महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागातील परीक्षा केंद्रावरून एकाच दिवशी व एकाच वेळी दोन परीक्षेला बसलेले आढळले. त्यांनी एकाच दिवशी एकाच वेळी दोन परीक्षा देण्याचा *चमत्कार*, मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या गलथान कारभारामुळे केला. हे सर्व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा केंद्रांना पाठविलेल्या पत्रावरून व त्याला सहपत्र जोडलेल्या डेटावरून दिसून आले. आता मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने परीक्षा केंद्रांना या बाबत विचारणा केली आहे. त्यातून काय निष्पन्न होईल ते काळच ठरवेल. नेहमीप्रमाणे कोण्यातरी कनिष्ठ अधिकाऱ्याला बळीचा बकरा बनविण्यात येईल व उच्च पदस्थ अधिकारी या अनागोंदी कारभाराची जबाबदारी दुसऱ्याच्या माथी मारतील. परंतू या प्रकारामुळे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचा भोंगळ कारभार उघडकीस आला. अशाने मुक्त विद्यापीठाच्या 'पदवी'वर प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यात प्रामुख्याने नमूद करावेसे वाटते की यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने, करोडो रुपये खर्च करून यंदाच्या उन्हाळी परीक्षा २०२६ मध्ये गैरप्रकार रोखण्यासाठी सर्व ५५८ परीक्षा केंद्रांवर 'एआय' आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसवले. तरी परीक्षेत असे गैरप्रकार घडत असतील,मग प्रश्न निर्माण होतो की काय हे करोडो रुपये पाण्यात गेले?मग या वाया गेलेल्या पैशाची जबाबदारी कोण घेणार? तसेच मुक्त विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी परीक्षा नियंत्रक हे पद वैधानिक पद असूनही, रिक्त झाल्यानंतर, नियमित पदभरती न करता बाहेरील विद्यापीठातून आलेल्या निवृत्त अधिकाऱ्याकडेच हे पद कायम ठेवले.

यंदा चालू वर्षामध्ये (२०२६) नीट-युजी आणि सीटीईटी या परीक्षांमध्ये गंभीर गोंधळाच्या घटना समोर आल्या आहेत. त्यात केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा पण दिला. अशा परीक्षेतील गोंधळामुळे विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळते व परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास ढासळू शकतो. त्यामुळे विद्यापीठांनी पण परीक्षा या गांभीर्याने घेतल्या पाहिजे व गैरप्रकार किंवा निष्काळजीपणा झाल्यास, संबंधित जबाबदार उच्च पदस्थ अधिकाऱ्याने नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी आहे.

# राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेची अकोल्यात कुतूहलने घेतली जबाबदारी!

## गावापासून देशापर्यंत पोहोचण्याची संधी; 15 ऑगस्टपूर्वी नोंदणी आवश्यक




### शाळेत न जाणाऱ्या मुलांसाठीही विज्ञानाचे दार उघडे

विज्ञानाची जिज्ञासा शाळेच्या भिंतींमध्ये बंदिस्त नसते. शेतात काम करणाऱ्या मुलाला विज्ञानाचे प्रश्न पडू शकतात. गावात राहणाऱ्या मुलाला विज्ञानाचे प्रश्न पडू शकतात. घरात शिकणाऱ्या मुलाला विज्ञानाचे प्रश्न पडू शकतात. म्हणून लागू असलेल्या परिषद नियमांनुसार पात्र असलेल्या शाळेत शिकणाऱ्या तसेच शाळेबाहेरील मुलांनाही वैज्ञानिक विचार मांडण्याची संधी उपलब्ध होणे ही या चळवळीची समावेशक भावना आहे. विज्ञानावर कोणाचाही एकाधिकार नाही. जिज्ञासा असणारा प्रत्येक बालक विज्ञानाचा विद्यार्थी आहे. विज्ञानात कोणी द्रोणाचार्य नाही त्यामुळे कोणी एकलव्य बनणार नाही.

### अपयशाची भीती कमी होते

वाढणाऱ्या आत्महत्या, सहज मिळणारे नैराश्य या आज वाढणाऱ्या बाबी या अपयशाच्या भीती असतात. राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेत सहभाग घेतल्याने अपयशाची जाणीव होते आणि त्याची भीती कमी होते. कारण वैज्ञानिक प्रयोग प्रत्येक वेळी यशस्वी होत नाही. कधी प्रयोग फसतो. कधी अपेक्षित परिणाम मिळत नाही. कधी गृहीतक चुकीचे ठरते. परंतु विज्ञान सांगते- अपयश म्हणजे शेवट नाही; तो पुढील प्रयोगासाठी मिळालेला धडा आहे. एनसीएससी विद्यार्थ्याला ही अत्यंत मौल्यवान जीवनदृष्टी देते.

### सर्वात मोठा पुरस्कार कोणता?

समजा तुमच्या प्रकल्पाला पुरस्कार मिळाला नाही. तरी तुम्ही काय मिळवले? तुम्ही प्रश्न विचारायला शिकलात. तुम्ही माहिती शोधली. प्रयोग केला. चूक केली. पुन्हा प्रयत्न केला. आकडेवारी समजून घेतली. निष्कर्ष काढला. लोकांसमोर उभे राहून स्वतःचे विचार मांडले. यापेक्षा मोठा पुरस्कार कोणता? पुरस्काराची ट्रॉफी काही दिवस चमकते. पण वैज्ञानिक विचार करण्याची क्षमता संपूर्ण आयुष्य उजळून टाकते.

### 'मी कोण आहे?' याचा शोध

प्रत्येक मुलामध्ये काहीतरी विशेष क्षमता असते. कुणी निरीक्षणात हुशार असतो. कुणाला गणित आवडते. कुणी प्रयोग छान करतो. कुणी उत्तम माहिती शोधतो. कुणी सुंदर सादरीकरण करतो. कुणी उत्तम मॉडेल तयार करतो. कुणी नेतृत्व करतो. राष्ट्रीय बालविज्ञान परिषद विद्यार्थ्याला स्वतःच्या या क्षमतांचा शोध घेण्याची संधी देते.

एका छोट्या गावातील मुलाच्या मनात निर्माण झालेला प्रश्न जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचू शकतो. यामुळे विद्यार्थ्याला एक विलक्षण अनुभव मिळतो- 'माझ्या गावातील प्रश्नालाही राष्ट्रीय महत्त्व असू शकते!' ही भावना ग्रामीण आणि निमशहरी विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रेरणादायी आहे. राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करण्याची संधी राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेत प्रकल्प सादर करणे ही स्वतःमध्ये अभिमानाची गोष्ट आहे. विद्यार्थ्याला विविध स्तरांवर आपले काम मांडण्याची संधी मिळते. त्यामुळे त्याच्या कामाची दखल शिक्षक, तज्ज्ञ, वैज्ञानिक, संशोधक आणि इतर विद्यार्थी घेतात. परंतु येथे एक गोष्ट लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे-खरे यश म्हणजे फक्त पुरस्कार मिळवणे नव्हे; वैज्ञानिक पद्धतीने विचार करायला शिकणे हे त्याहून मोठे यश आहे.

प्रसिद्ध वैज्ञानिकांना भेटण्याची आणि त्यांच्याकडून शिकण्याची संधी विज्ञानाच्या क्षेत्रातील व्यक्तींशी संवाद साधणे हा विद्यार्थ्यासाठी अविस्मरणीय अनुभव असतो. एखाद्या वैज्ञानिकाला जवळून पाहिल्यावर मुलाच्या मनात विचार येतो- 'मीही मोठा झाल्यावर असे संशोधन करू शकतो का?' याच एका विचारातून कारकीर्दीचे स्वप्न जन्म घेऊ शकते. कधी कधी एका वैज्ञानिकाची भेट, एक प्रेरणादायी वाक्य किंवा एका प्रकल्पाचे कौतुक विद्यार्थ्याच्या संपूर्ण आयुष्याला दिशा देऊ शकते. भविष्यातील शिक्षणासाठी मजबूत पाया. आजच्या जगात फक्त पाठांतर पुरेसे नाही. भविष्यात विद्यार्थ्यांना क्रीटीकल थिंकींग, क्रिएटीव्हीटी, कम्युनिकेशन,कोलॅब्रेशन आणि प्रॉब्लेम सॉल्व्हींग यांसारख्या कौशल्यांची आवश्यकता आहे. राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेत या सर्व कौशल्यांचा नैसर्गिक पद्धतीने विकास होतो.म्हणून एनसीएससी अनुभव पुढील उच्च शिक्षणासाठीही अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. वैज्ञानिक करिअरची दारे उघडू शकतात एखाद्या विद्यार्थ्याला एनसीएससीच्या प्रकल्पातून प्रथमच जाणवते- 'मला विज्ञान आवडते!' यानंतर त्याला संशोधन, अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्र, पर्यावरणशास्त्र, कृषीशास्त्र, खगोलशास्त्र, संगणकशास्त्र, जैवतंत्रज्ञान, डेटा सायन्स, रोबोटिक्स, ऊर्जा किंवा इतर वैज्ञानिक क्षेत्रांकडे जाण्याची प्रेरणा मिळू शकते. म्हणून एनसीएससी ही केवळ एका वर्षाची स्पर्धा नसून वैज्ञानिक करिअरची पहिली पायरी ठरू शकते.

#### समाजासाठी काहीतरी करण्याची भावना

राष्ट्रीय बालविज्ञान परिषद विद्यार्थ्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारते-'तुझ्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी कसा होईल?' म्हणून प्रकल्प केवळ सुंदर मॉडेल बनवण्यापुरता मर्यादित राहत नाही. विद्यार्थी विचार करू लागतो- माझ्या गावासाठी मी काय करू शकतो? माझ्या शेतकऱ्याला मी कशी मदत करू शकतो? पाण्याची बचत कशी करू शकतो? ऊर्जा वाचवू शकतो का? कचरा कमी करू शकतो का? पर्यावरणाचे संरक्षण करू शकतो का? यातून विज्ञानासोबतच सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित होते. विकसित भारताच्या निर्मितीत बालवैज्ञानिकांची भूमिका भारताला विकसित, आत्मनिर्भर आणि ज्ञानसमृद्ध राष्ट्र बनवण्यासाठी मोठ्या संख्येने जिज्ञासू, सर्जनशील आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या तरुणांची आवश्यकता आहे. आजचा बालवैज्ञानिक म्हणजे उद्याचा- शास्त्रज्ञ, अभियंता, डॉक्टर, संशोधक, उद्योजक, शिक्षक, नवोन्मेषक किंवा धोरणनिर्माता. म्हणून बालविज्ञान परिषद ही केवळ मुलांसाठीची कृती नाही. ती भारताच्या वैज्ञानिक भविष्याची पायाभरणी आहे.

#### बालवैज्ञानिकांसाठी एक स्वप्न

कल्पना करा- आज तुम्ही आपल्या गावातील पाण्याच्या समस्येवर प्रकल्प करता. उद्या तुम्ही जलव्यवस्थापनाचा अभ्यास करता. पुढे तुम्ही अभियंता किंवा वैज्ञानिक होता. आणि एका दिवशी तुमच्या संशोधनामुळे हजारो गावांना पाणी मिळते. किंवा - आज तुम्ही शेतातील एखाद्या छोट्या समस्येवर प्रयोग करता. उद्या तुम्ही कृषीशास्त्रज्ञ होता. आणि तुमच्या संशोधनामुळे शेतकऱ्याचा उत्पादनखर्च कमी होतो. किंवा- आज तुम्ही कचऱ्याच्या समस्येवर एक छोटासा प्रयोग करता. उद्या तुमची कल्पना मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. ही स्वप्ने अशक्य नाहीत. प्रत्येक मोठ्या संशोधनामागे कधीतरी एक छोटासा प्रश्न असतो. प्रिय बालवैज्ञानिक, तुला सर्व उत्तरे माहीत असण्याची गरज नाही. तुला मोठी प्रयोगशाळा असण्याची गरज नाही. तुला महागडी उपकरणे असण्याची गरज नाही. तुला फक्त जिज्ञासा हवी. प्रश्न विचारण्याचे धैर्य हवे. प्रयोग करण्याची तयारी हवी. आणि अपयशातून शिकण्याची वृत्ती हवी.

तुझ्या घराभोवती पाहा. तुझ्या शाळेकडे पाहा. तुझ्या गावाकडे पाहा. तुझ्या शेताकडे पाहा. तुझ्या नदीकडे, विहिरीकडे, आकाशाकडे पाहा. एखादा प्रश्न शोध. त्या प्रश्नामागचे विज्ञान शोध. प्रयोग कर. निष्कर्ष काढ. आणि मग आत्मविश्वासाने जगाला सांग- 'हा माझा प्रश्न आहे. हा माझा प्रयोग आहे. हा माझा निष्कर्ष आहे. आणि ही माझ्या भारतासाठीची माझी कल्पना आहे!' राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २०२६ प्रत्येक बालकात एक वैज्ञानिक दडलेला आहे. त्या वैज्ञानिकाला जागे करण्याची संधी आहे. आजचा प्रश्न उद्याचा शोध, आजचा प्रयोग उद्याची कल्पना, आजचा बालवैज्ञानिक उद्याचा भारत घडवणारा वैज्ञानिक... चला, प्रश्न विचारूया... प्रयोग करूया... स्वप्ने पाहूया... आणि भारत घडवूया ! राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २०२६ 'विज्ञान शिका नाही-विज्ञान जगा!'

**डॉ. नितीन ओक,**

#### लेखकाविषयी....

डॉ. नितीन ओक हे शिक्षण क्षेत्रातील एक प्रवासी, सीऱ्याकूस विद्यापीठ ह्वह्यड्ड मधून डॉक्टरेट नासा मध्ये द्मस्रह्वष्ठह्लशह्म् त्यानंतर साधारण तीन दशक शिक्षण क्षेत्रात आयआयटी, प्रख्यात संशोधन संस्था, मेडिकल क्षेत्रात नावाजलेल्या संस्था येथे विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवण्या (आणि तिथे नेत्रदीपक यश मिळवण्या) योग्य शिक्षण देऊन आता राज्य शिक्षण विभाग, अकोला शिक्षण विभाग, जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ, विज्ञान भारती, अशा संस्थाद्वारे आणि डॉ. राजकुमार अवसरे, डॉ. रवींद्र भास्कर, सारख्या व्यक्तिमुळे कसे शिकवायचे आणि कसे शिकायचे याचे शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांना निशुल्क मार्गदर्शन ते करतात.

## एका मृत दाताच्या अवयव दानामुळे आठ जणांचे प्राण वाचू शकतात!



आज जागतिक अवयवदान दिन

एका मृत दात्याच्या यकृत, किडनी, हृदय, फुफ्फुसे अशा महत्त्वाच्या अवयवांमुळे तब्बल ८ जणांचे प्राण वाचू शकतात. जिवंत दान : यामध्ये जिवंत व्यक्ती आपल्या एका किडनी किंवा यकृताचा काही भाग कायदेशीर व वैद्यकीय तपासणीनंतर दान करू शकते. शवदान : व्यक्तीला 'ब्रेन डेड' घोषित केल्यानंतर तिच्या संमतीने किंवा नातेवाईकांच्या परवानगीने अवयवदान केले जाते. अवयवदानासाठी कोणतेही कडक वय नाही; आरोग्याची स्थिती पाहून निर्णय घेतला जातो. १८ वर्षांखालील व्यक्तींना पालकांची परवानगी लागते. धर्म, जात किंवा वयाचा विचार न करता निरोगी व दीर्घ आजार (जसे की कर्करोग किंवा एचआयव्ही) नसलेली कोणतीही व्यक्ती अवयव दात्याची नोंदणी करू शकते.जागतिक अवयवदान दिन दरवर्षी १३ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. या दिवशी जगभरातील लोकांना अवयवदानाचे महत्त्व पटवून दिले जाते. अवयवदान हे एक असे माध्यम आहे ज्याद्वारे एखाद्या गरजू व्यक्तीला नवजीवन मिळू शकते. गंभीर अवयव निकामी झाल्यामुळे भारतातील हजारो लोक प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर दान केलेले अवयव अनेकांचे जीव वाचवण्यास मदत करतात. अशा परिस्थितीत एखादी व्यक्ती कोणते अवयव दान करू शकते.

प्रत्यारोपण करण्यायोग्य अवयवांचा तीव्र तुटवडा आहे. अवयवांची मागणी आणि पुरवठा यांच्यातील प्रचंड तफावतीमुळे प्रत्यारोपणासाठी पात्र असलेल्या रुग्णांना लांबच लांब प्रतीक्षा याद्या पाहाव्या लागतात. अधिक लोकांचे प्राण वाचवण्यासाठी अवयवदानाचे प्रमाण वाढवण्याकरिता सरकार, वैद्यकीय व्यावसायिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था आणि सर्वसामान्य जनता या सर्वांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे.

#### जिवंतपणी कोणते अवयव दान करू शकतो!

मूत्रपिंड : मृत दाता त्याच्या दोन्ही किडन्या दान करू शकतो. वैद्यकीय आणि कायदेशीर नियमांनुसार जिवंत व्यक्तीही किडनी दान करू शकते.

**यकृत :** मृत व्यक्ती यकृत दान करू शकते. एक जिवंत व्यक्ती देखील यकृताचा काही भाग दान करू शकते, कारण यकृताचे काही भाग कालांतराने पुन्हा निर्माण होतात.

**हृदय :** मृत व्यक्तीचे हृदय गंभीर हृदयविकाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांमध्ये प्रत्यारोपण केले जाऊ शकते. यासाठी दात्याची आरोग्य स्थिती आणि अवयवाची योग्यता महत्त्वाची आहे.

**फुफ्फुस :** मृत दाता दोन्ही फुफ्फुस दान करू शकतो, तर जिवंत दाता एकच फुफ्फुस दान करू शकतो.

**स्वादुपिंड :** स्वादुपिंड हा एक महत्त्वाचा अवयव आहे जो दान करता येतो. काही परिस्थितींमध्ये, जिवंत दाते देखील त्यातील काही भाग दान करू शकतात.

**आतडे :** प्रत्यारोपणासाठी दान केलेल्या अवयवांमध्ये लहान आतडे देखील आहे.

**अवयवांव्यतिरिक्त इतर ऊतींचे दान :** याव्यतिरिक्त, कॉर्निया, त्वचा, हाडे, हृदयाच्या झडप, रक्तवाहिन्या, नसा आणि कंडरा यासारख्या ऊतींचे देखील दान केले जाऊ शकते. कॉर्निया प्रत्यारोपण दृष्टी पुनर्संचयित करण्यात मदत करते, तर त्वचेच्या कलमांचा वापर गंभीर भाजलेल्या आणि जखमांवर उपचार करण्यासाठी केला जातो.

#### जिवंत असताना कोणते अवयव दान करता येतात?

जिवंत व्यक्ती सर्व अवयव दान करू शकत नाही. नॅशनल ऑर्गन अँड टिश्यू ट्रान्सप्लांट ऑर्गनायझेशननुसार, जिवंत दाते मूत्रपिंड, यकृताचा एक भाग आणि स्वादुपिंडाचा काही भाग दान करू शकतात. काही विशिष्ट परिस्थितींमध्ये, फुफ्फुसाचा किंवा लहान आतड्याचा काही भाग दान करणे देखील शक्य आहे.

# युवकांच्या शक्तीच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून त्यांचा सन्मान करणे!



दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. तरुणांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधणे, त्यांच्या शक्तीचा सन्मान करणे आणि जागतिक घडामोडींमध्ये त्यांचा सहभाग वाढवणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. भारतात १२ जानेवारी हा स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून पाळला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने १७ डिसेंबर १९९९ रोजी १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून घोषित केला.वियना येथे १९९१ मध्ये भरलेल्या जागतिक युवा मंचाने पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्याची शिफारस केली होती. पहिला अधिकृत आंतरराष्ट्रीय युवा दिन १२ ऑगस्ट २००० रोजी साजरा करण्यात आला.महत्त्वतरुणांना भेडसवणाऱ्या बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य आणि मानसिक आरोग्याच्या समस्यांवर चर्चा करणे.समाजाच्या विकासात आणि देश उभारणीत युवकांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व योगदानाला प्रोत्साहन देणे. जागतिक स्तरावर तरुणांचे हक्क आणि त्यांना मिळणाऱ्या संधी सुरक्षित करणे. विविध उपक्रमजगभरात या दिवशी चर्चासत्रे, कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि डिजिटल मोहिमा राबवल्या जातात. युवा वर्गाला एकत्र आणून त्यांच्यातील नेतृत्वगुण विकसित करण्याचे काम केले जाते. आंतरराष्ट्रीय युवा दिन हा संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेला एक जागृती दिन आहे. युवकांशी संबंधित सांस्कृतिक आणि कायदेशीर समस्यांकडे लक्ष वेधणे हा या दिवसाचा उद्देश आहे . आंतरराष्ट्रीय युवा दिन दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. जगभरातील युवकांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सरकार आणि इतरांना ही एक संधी मिळावी, हा त्यामागील उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय युवा दिनादरम्यान, जगभरात संगीत कार्यक्रम, कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि राष्ट्रीय व स्थानिक सरकारी अधिकारी तसेच युवा संघटनांच्या बैठका आयोजित केल्या जातात. युवकांसाठी जबाबदार असलेल्या मंत्र्यांच्या जागतिक परिषदेने पोर्तुगालमधील लिस्बन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ दरम्यान झालेल्या आपल्या पहिल्या सत्रात १२ ऑगस्ट हा आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून घोषित करण्याचा ठराव मंजूर केला. नंतर १७ डिसेंबर १२१२ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने ठराव ५४/१२० स्वीकारून या शिफारशीला मान्यता दिली.

दरवर्षी, आंतरराष्ट्रीय युवा दिनी तरुणांवर परिणाम करणाऱ्या समस्या आणि जागतिक विकासातील त्यांची भूमिका याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी एक संकल्पना स्वीकारली जाते. प्रत्येक युवा दिन जगभरातील अनेक कार्यक्रमांशी निगडित असतो; उदाहरणार्थ, २०१३ मध्ये १२ ऑगस्टच्या आंतरराष्ट्रीय युवा दिनापूर्वी, १०-११ ऑगस्ट रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय युवा परिषदेचा यात समावेश होता. या परिषदेत विविध देशांतील आणि कार्यक्षेत्रांतील वत्तॄयांचा समावेश होता, त्यानंतर युवा पुरस्कार सोहळा आणि उत्साह वाढवणारे वादविवाद व चर्चा झाल्या. याचे आयोजन चेन्नई येथील अमेरिकी वाणिज्य दूतावासाने केले होते. आयवायडी '१८ आणि आयवायडी '१९ चे आयोजन चेन्नई येथील इंडियन युथ कॅफेने केले होते. हे कार्यक्रम विशेषतः युवा शक्तीला सक्षम करण्यावर केंद्रित होते.

**२०१४ :** युवक आणि मानसिक आरोग्य
**२०१५:** युवक आणि नागरी सहभाग
**२०१६ :** २०३० कडे वाटचाल : दारिद्र्य निर्मूलन आणि शाश्वत उपभोग व उत्पादन साध्य करणे
**२०१७:** युवकांनी शांततेची उभारणी केली
**२०१८:** युवकांसाठी सुरक्षित जागा
**२०१९:** शिक्षणाचे परिवर्तन
**२०२०:** जागतिक कृतीसाठी युवकांचा सहभाग
**२०२१:** अन्न प्रणालींमध्ये परिवर्तन : मानवी आणि ग्रहीय आरोग्यासाठी युवा नवोपक्रम
**२०२२:** आंतरपिढीगत ऐक्य: सर्व वयोगटांसाठी जगाची निर्मिती
**२०२३:** युवकांसाठी हरित कौशल्ये: एका शाश्वत जगाच्या दिशेने
**२०२४:** क्लिक्सपासून प्रगतीपर्यंत: शाश्वत विकासासाठी युवकांचे डिजिटल मार्ग
**२०२५:** एसडीजी आणि त्यापुढील स्थानिक युवकांच्या कृती. ('एसडीजी' म्हणजे ' शाश्वत विकास उद्दिष्टे ')

# संत सावता माळी महाराजांचा सर्वत्र जयघोष

# टाळ-मृदंगाच्या गजरात निघाली पालखी शोभायात्रा

## शोभा रथावर महाराजांचा देखावा ठरला आकर्षन

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोट :** अकोट शहरांमधील श्री संत शिरोमणी सावता माळी महाराज व श्री विठ्ठल मंदिर संस्थान सोमवार वेस व नंदीपेठ वासी यांनी ७३१ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे केले भव्य आयोजन करण्यात आले होते.

कांदा मुळा भाजी ! अवघी विठाबाई माझी || लसूण मिरची कोथिंबीर ! अवघा झाला माझा हरी || सालाबाद प्रमाणे याही वर्षी मोठ्या आनंद उत्सवात भावभक्ती वातावरणात श्री संत शिरोमणी सावता माळी, विठ्ठल मंदीर सोमवार वेस, फुले चौक, व नंदीपेठ येथील श्री नंदकिशोर संस्थान मध्ये संजीवनी सोहळ्यामध्ये ऋत्विक महाराज बोरुडे यांनी संगीत संध्या कार्यक्रम केला व दीप उत्सव आणि महाआरतीचे नंदिपेट वाशी भाविकांनी भव्य आयोजन करून ट्रॅक्टरवर संत सावता महाराजांचे जिवंत चित्र रेखाटून विशेष आकर्षण सजवले होते भव्य शोभा यात्रेमध्ये सांप्रदायिक टाळकरी मृदुंग भजनी



व पुरुष मंडळाचा अनोखा गायनाचा पाठ पायाला मिळाला व विशेष पोशाख व त्यांच्या कीर्तनाच्या पावल्यांसह भाविकांनी मनमुराद आनंद लुटत शोभायात्रा नंदिपेठ मधून काढत प्रकाश गायकी नितीन लांडे सचिन काळे राजू बेलसरे व मयूर निमकर यांनी आभार मानले फटाक्यांच्या आकाशबाजी मध्ये मंदिरामध्ये हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाआरतीचे आयोजन विशेष भावभक्तीत आटोपून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले, सावता माळी पुण्यतिथीनिमित्त सोमवार वेस, येथून शनवारा, यात्रा चौक, येथून भव्य प्रमाणात पालखी व मिरवणूक काढल्यात आली भव्य शोभा यात्रेमध्ये गणेश गावडे महाराज यांचे महिला भजनी मंडळ तसेच केमलापुर येथील बोडखे महाराज यांचे ढोलांचे भजन, सोमवार वेस येथील सुरेश सावरकर, यांचे ढोलाचे भजन यात्रा चौक येथील राजु बोरोडे ढोलाचे भजन तसेच शनवारा, नंदीपेठ यांनी भजनी मध्ये सहभाग घेतला तसेच मिरवणूकीमध्ये पुरुष मंडळी तरुण कार्यकर्त हजारोच्या संरथेने सहभागी झाले. विठ्ठल मंदिर संस्थानचे अध्यक्ष श्री. आशिष बेलोकार यांचे हस्ते पालखीचे पुजन करवात आले. सोमवार वेस येथे मोठ्या प्रमाणात यात्रा भरली. काल्याचे किर्तन बोडखे महाराज यांचे हस्ते विठ्ठल मंदीर येथे करण्यात आले. व प्रसादाचे वाटप मारुती संस्थान भंडारा अध्यक्ष विजय जुनगरे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले या संजीवनी सोहळा यात्रेमध्ये सर्व महिला व पुरुष समाज बांधव हजारोच्या संख्येने उपस्थिती लावली होती.

# कावड उत्सवापूर्वी अकोटचे खड्डे बुजवा!

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोट :** ७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या भव्य कावड उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अकोट शहरातील खड्डे तातडीने बुजवावेत, तसेच मिरवणूक मार्गासह संपूर्ण शहरात विशेष स्वच्छता मोहीमराबवावी, अ श ीमागणी श्रावण मास उत्सव समितीने नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनातून केली आहे.

कावड उत्सवासाठी हजारो भाविक शहरात दाखल होणार आहेत. मात्र, प्रमुख रस्त्यांवरील



खड्डे आणि ठिकठिकाणी साचलेला कचरा पाहता भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उत्सवापूर्वी खड्डे बुजविणे, कचरा हटविणे आणि मिरवणूक मार्गावरील पथदिवे सुरळीत ठेवणे आवश्यक असल्याचे समितीने म्हटले आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# मूर्तिजापुरात दादागिरीच्या ठेकेदारीला लगाम

## लोकप्रतिनिधींच्या भूमिकेने ठेकेदारांमध्ये खळबळ

**मूर्तिजापूर :** शहरातील विकासकामांच्या ठेक्यांमध्ये दबाव, दादागिरी किंवा मनमानी करण्याच्या प्रकारांना आता आळा बसू लागला आहे. नगरपरिषद तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत विविध कामे मिळवून ती आपल्या प्रभावाच्या जोरावर राबविण्याचा प्रयत्न करणाऱ्या ठेकेदारांना लोकप्रतिनिधींनी चांगलाच धडा शिकविल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

विकासकामे ही नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी असून, त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दादागिरी किंवा दबावाचे राजकारण खपवून घेतले जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका लोकप्रतिनिधींनी घेतल्याचे सांगण्यात येत आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी असलेल्या ठेकेदारांवर कारवाई करण्याची भूमिका घेण्यात आली असून, आवश्यकतेनुसार संबंधितांना काळ्या यादीत टाकण्याची आणि भविष्यात कामे न देण्याची भूमिका पुढे आली आहे. नगरपरिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून शहरात कोट्यवधी रुपयांची विविध विकासकामे केली जातात. या कामांमध्ये पारदर्शकता, गुणवत्तेला प्राधान्य आणि नागरिकांच्या पैशांचा योग्य विनियोग होणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारीच्या नावाखाली कोणाचीही दादागिरी चालणार नाही, असा संदेश या भूमिकेमुळे गेला आहे. दरम्यान, ठेकेदारांनीही नियम व शासकीय अटींचे पालन करून कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवा - ठाणेदार सचिन पाटील



प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**हिवरखेड :** पोलिस स्टेशनमध्ये ११ ऑगस्ट रोजी दुपारी ५ वाजता शांतता समितीची बैठक घेण्यात संपन्न झाली. येणाऱ्या श्रावण मासात अधिक जास्त धार्मिक उत्सव असून यामध्ये कावड यात्रा व ईद मिलाद येत्या आठवड्यात आहेत. हे सण उत्सव शांततेत साजरे करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गावातील शांतता समितीचे सदस्य, पोलिस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, पत्रकार बांधवानी उपस्थिती दर्शुण सहभाग नोंदवला तर विविध सामाजिक बांधिलकी जोपासण्या बाबत लोकप्रतिनिधी यांनी सामूहिक विषय मांडले. तसेच पोलिस स्टेशनचे ठाणेदार यांनी यावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत आपले विचार व्यक्त केले. हिवरखेडवासी सुद्धा प्रत्येक सण उत्सव गुण्यागोविंदाने पार पाडतात, अशी माहिती उपस्थित शांतता समितीचे सदस्य यांनी यावेळी दिली.

# बाल शिवाजी प्राथमिक शाळेचे गायन स्पर्धेत घवघवीत यश, स्वराज समीर थोडगे प्रथम

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोला :** ब्राह्मण सभा संचालित बाल शिवाजी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जठारपेठ, अकोला येथील विद्यार्थ्यांनी आंतरशालेय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले.

स्कूल ऑफ स्कॉलर्स, बिर्ला कॉलनी, अकोला यांच्या वतीने आयोजित 'अनामवीरा' या देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत बाल शिवाजी प्राथमिक शाळेच्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी 'ब' गटातून सहभाग घेत द्वितीय क्रमांक पटकावला. या समूहात मधुरा राजेश भोंडे, आर्या अभिजित शेगावकर, पलक मिलिंद लांडे, ओजस्वी पराग देशमुख, स्वरा प्रफुल्ल वरोकार, शांभवी अभिषेक सोनगावकर, आनंदी अनिल कुलकर्णी आणि भार्गव अनिल





भगत यांचा समावेश होता. तसेच 'अ' गटातील वैयक्तिक गायन स्पर्धेत के.जी.-२ च्या स्वराज समीर थोडगे याने प्रथम क्रमांक मिळवत बाल शिवाजी शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. या विद्यार्थ्यांना गायनासाठी सौ. सरोज जोशी यांनी हार्मोनियमची साथ दिली, तर श्री. पुरुषोत्तम कोरान्ने यांनी तबल्याची साथ दिली. तसेच समर्थ विजय ढोरे या विद्यार्थ्यानेही तबल्याची साथ देत स्पर्धेत योगदान दिले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. अविनाश देव, सचिव मोहन गद्रे, सौ. अनघा देव, शाळा समिती सदस्य, मुख्याध्यापिका सौ. संगिता जळमकर, मा. सौ. किर्ती चोपडे यांच्यासह सर्व शिक्षिका व कर्मचारीवृंद यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले.

# तेल्हारा येथे शिवसृष्टी निर्माण करण्यास सुरुवात

**तेल्हारा :** स्थानिक अग्रसेन टॉवर चौकालगत अस्तित्वात असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा सन्मानपूर्वक हटविण्यात आला असून, त्या ठिकाणी भव्य अश्वारूढ पुतळ्यासह आकर्षक 'शिवसृष्टी' निर्माण करण्याच्या कार्याला मंगळवार, ११ ऑगस्ट रोजी प्रारंभ झाला आहे.२६ जुलै १९६९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने तत्कालीन नगराध्यक्ष (दिवंगत) रामचंद्र तुलाराम मलिये यांच्या कारकिर्दीत व हस्ते या ठिकाणी छत्रपती शिवरायांचा अर्धपुतळा व उद्यानाचे भूमिपूजन करण्यात आले होते. त्यानंतर येथे अर्धपुतळा उभारण्यात आला. पुढे २ फेब्रुवारी २०१२ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष सुनील पालीवाल यांच्या कारकिर्दीत या पुतळ्याचे व उद्यानाचे लोकार्पण पार पडले होते. तेल्हारा शहरातील नागरिकांकडून गेल्या अनेक वर्षांपासून अग्रसेन टॉवर चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसवण्यात यावा, अशी सातत्याने मागणी होत होती.

# संत सावता माळी यांची पुण्यतिथी विविध उपक्रमांनानी साजरी



प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**हिवरखेड :** येथे संत सावता माळी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

पुण्यतिथीनिमित्त सकाळी वैकुंठधाम स्मशानभूमी, कर्लाविश येथे वृक्षारोपण करण्यात आले,संत सावता माळी महाराजांनी समाजाला दिलेल्या मानवसेवा, श्रमप्रतिष्ठा आणि पर्यावरण संवर्धनाच्या विचारांना अभिवादन म्हणून विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. सायंकाळी संत सावता माळी यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन व हार अर्पण करून सावता महाराजांच्या अभंगांचे गायन, भजन व नामस्मरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. भक्तिमय अभंग आणि नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या कार्यक्रमातून 'संत सावता महाराजांचे विचार आचरणात आणूया आणि समाजसेवेसोबत पर्यावरणाचेही रक्षण करूया' असा संदेश सुद्धा देण्यात आला. कार्यक्रमास समाजबांधव, भाविक, नागरिक व युवक उपस्थित होते.

# कोहाकुंड येथे जागतिक आदिवासी दिन साजरा



प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोट :** अकोट दि.९ ऑगस्ट रोजी ग्राम कोहाकुंड येथे बिरसा क्रांती ग्रुप तर्फे तसेच जि. अजबराव उईके यांच्या मार्गदर्शनात जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला सर्व गावातील आदिवासी महिला व पुरुषांनी मोठ्या आनंदाने हजेरी लावली प्रथम भगवान बिरसा मुंडा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अ.भा. आदिवासी विकास परिषदेचे कार्याध्यक्ष दिगंबर सोळंके (वस्ताद) गुल्लरघाट सरपंच प्रकाश डाखोरे, गणेश बुटे ,विठ्ठल मळावी, राहुल सोळंके, बळीराम कासदेकर, राजपाल बळगे, शंकर बागडे, केंडे, कासदेकर यांचा हार व फुलगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला या कार्यक्रमात मान्यवरांनी गावकऱ्यांना ९ ऑगस्ट दिनाला मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी कार्यक्रमाचे आयोजन हिरालाल कासदेकर यांनी कोरकू भाषेत भाषण करून सर्वांचे लक्ष वेधले तर दिगंबर सोळंके यांनी सुसंस्कृती संस्कार आणि ९ ऑगस्ट दिनाचे महत्त्व पटवून सांगितले आदिम आदिवासी समाजातील मुलांनी शिक्षणाला किती महत्त्व द्यावे जनजमातीने एकमेकांना कसे सहाय्य करावे याबाबत तेथील मुला-मुलींनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाची प्रस्तावना हिरालाल कासदेकर यांनी केली तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विठ्ठल मळावी यांनी केले तसेच कार्यक्रमाचे व्यवस्थापन विशाल ढिगर, सुनील बेलसरे, सुरेश शिंदे, दुवेज भिलावेकर, रतीराम कासदेकर यांनी केले यावेळी गावातील कार्यकर्ते नानाक्रम कासदेकर, हरी धुर्वे, रामा काजलेकर, सतीश भिलावेकर, बन्सीलाल टिकार, गोपाल बावस्कर, तुळशीराम ढिगर, अजिलाल कासदेकर, मुंजीलाल ढिगर, फुलचंद, बेलसरे पवन ढिगर, अजय शिंदे, विनोद दुर्वे तसेच गावातील सर्व महिला पुरुषांनी यावेळी हजेरी लावली.

# श्रीमती रतनबाई ताराचंदजी कानूंगा विद्यालयामध्ये मिशन उडान कार्यक्रम



प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**हिवरखेड :** येथील श्रीमती रतनबाई ताराचंदजी कानुंगा विद्यालयांमध्ये मिशन उडान कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी सुरक्षा व महिला सुरक्षा अभियान कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप ठाणेदार गोपाल गिलबिले तर प्रमुख पाहुणे म्हणून महिला पोलीस कर्मचारी रेणुका पाबळे, अश्विनी करावते, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सीमा बांगर होत्या.

रेणुका पाबळे तसेच गोपाल गुलबिले यांनी विद्यार्थी सुरक्षा व महिला सुरक्षा व तंबाखू मुक्त शाळा विषयी माहिती दिली. मोबाईलचा अती वापर व सोशल मीडियावर फोटो अपलोड करू नये त्याचे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन दिले.

मुख्याध्यापक रवींद्र सोळंके व अंकुश हिवराळे यांनी मनोगत व्यक्त केले.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कार्यवाह श्यामशील भोपळे यांच्या मार्गदर्शनात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश हिवराळे यांनी तर आभार प्रदर्शन सौ. सीमा धुमाळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. झापर्डे, गायत्री इंगळे, आनंद राऊत व शिपाई सुनील धुरदेव यांचे सहकार्य लाभले.

# शाहिद आसिफ देशमुख यांच्या कुटुंबीयांची वंचित बहुजन आघाडीने घेतली सांत्वनपर भेट

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**बाळापूर :** दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी बाळापूर तालुक्यातील लोहारा येथील माजी सरपंच हाजी लतीफ देशमुख यांचे नातू व युवा शेतकरी शाहिद आसिफ देशमुख यांचा मन नदीच्या पात्रात चार बैलांसह झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता.

या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रविवारी (दि. ११ऑगस्ट रोजी लोहारा येथे जाऊन देशमुख कुटुंबीयांची सात्त्वनपर भेट घेतली. घरनाच्या आचानक गेट सोडल्याने व नदिची पातडी वाडल्याने आणि वाडु माफियां वाळु उत्खन्न करन्यासाठी चे



मोढमोठे खडडे केले ले होते त्यायमुळे युवा शेतकरी शाहिद आसिफ देशमुख यांचा मन नदीच्या पात्रात चार बैलासंह झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यु झाला होता. शाहिद आसिफ देशमुख यांच्या कुटुंबीयांची वंचित बहुजन आघाडीचे पदआधिकारी यांनी आज दिनांज ११ अगस्ट रोजी भेट दयुन शाहिद आसिफ देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी झाल्याची भावना व्यक्त केली यावेळी माजी आमदार सैय्यद .खतिफ जिल्हा महासचिव मिलिंद ईंगळे जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुनिल फाटकर सैय्यद वासीफ शहजाद खान शेखयुसुफ महदेव डोंगरे यांगेश शेळके संदेश मोरे तानाजी मोरे शंख अंसार जमीर शाह व अनेक .सर्व . वंचित आघाडी टिम देशमुख परिवाराच्या दूःखात सामील झाले होते.

# लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी तातडीने सुरु करा

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रवादीचे धरणे आंदोलन

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची बंद असलेली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने सुरू करावी, ई-केवायसीअभावी थांबलेला पात्र महिलांचा आर्थिक लाभ पूर्ववत करावा, तसेच प्रलंबित रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार, अकोला महानगर यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शहरातील विविध भागांतून महिला मोठ्या संख्येने आंदोलनस्थळी दाखल झाल्या. ई-केवायसी प्रक्रिया बंद असल्यामुळे पात्र असूनही अनेक महिलांना योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. या संपूर्ण धरणे आंदोलनाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष–शरदचंद्र पवारचे अकोला पश्चिम अध्यक्ष फिरोज खान हसन खान यांनी केले होते. त्यांच्या पुढाकाराने आंदोलनाची तयारी करण्यात आली आणि मोठ्या संख्येने महिला,





पदाधिकारी व कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले. या आंदोलनात प्रदेश उपाध्यक्ष श्याम अवस्थी, महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी, कार्याध्यक्ष देवानंद ताले, प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, अकोला महानगर युवा अध्यक्ष देवानंद राऊत आणि अकोला महानगर महासचिव शेख ऐनुलहक कुरेशी यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले. यावेळी अपंग सेल अध्यक्ष सालार भाई, शैलेश बोधडे, एड. संदीप तायडे आणि बाबा घुमरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

महिला पदाधिकाऱ्यांमध्ये अकोला महानगर अध्यक्ष सरला वरघट, मनीषा महाले, कोकिळा वाहूर वाघ, संगीता बाळू, नाजीमा परवीन, सुलभा घाडगे, उषा मकासरे, रेखा वरघट, सरिता घाडगे, उषा वानखडे, सभी या बानू, शफिया बिन, कमरून निसा आणि परविन बानू यांची उपस्थिती होती. धरणे आंदोलनानंतर पक्षाच्या प्रतिनिधी मंडळाने उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालून पात्र महिलांना न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास यापेक्षा मोठे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष–शरदचंद्र पवारच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाला दिला. आंदोलनात मोहम्मद उमर फारूक, हुसैन खान सुलतान खान, सैयद मोहसिन, फिरोज भाई, सैयद रिजवान, याया पठाण, आकाश बुंदेले, शैलेश गजभिये, कार्तिक देशमुख, वेद ठाकरे, संकेत चोपडे, नितेश बोराखडे आणि प्रदीप मस्तूद यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आश्रमशाळेतील मृत्यूवरुन माजी शिक्षणमंत्री प्रा.पुरके आक्रमक

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



**यवतमाळ** : गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील आदिवासी आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याच्या घटनेवरून माजी शिक्षणमंत्री तथा काँग्रेस आदिवासी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रा. वसंत पुरके यांनी सरकारवर टीका केली. या मृत्यूची नैतिक जबाबदारी स्वीकारून आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा, तसेच मुख्यमंत्री यांनीही जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी त्यांनी केली.

यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत पुरके बोलत होते. जपतलाई आश्रमशाळेतील दीपिका लकडा, सुष्मिता मंडल आणि अनु कोरेटी या तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशामुळे मृत्यू झाला. ही घटना केवळ दुर्दैवी अपघात म्हणून पाहता येणार नाही. विद्यार्थ्यांना सुरक्षित निवासाची आणि झोपण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली असती, तर दुर्घटना टाळता आली असती, असा दावा पुरके यांनी केला.

**आदिवासी विकास मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी**

आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप त्यांनी केला. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आश्रमशाळांमध्ये सुरक्षित खाटा, निवास आणि आरोग्यविषयक सुविधांची स्थिती तपासण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. खासगी अनुदानित आश्रमशाळांना विद्यार्थीसंख्येनुसार शासनाकडून निधी दिला जातो. या निधीचा वापर विद्यार्थ्यांच्या सुविधांसाठी योग्य पद्धतीने होतो का, याची चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

आदिवासी उपाययोजनांसाठी मोठ्या प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतूद होत असताना विद्यार्थ्यांना प्राथमिक सुविधा मिळत नसतील, तर निधीच्या वापराचे लेखापरीक्षण झाले पाहिजे, असे पुरके म्हणाले.

आदिवासी समाजाच्या जमिनी, जात प्रमाणपत्रे, आरक्षण आणि संविधानिक अधिकारांच्या प्रश्नांवरही त्यांनी सरकारला धारेवर धरले. आदिवासी विकास मंत्री प्रश्नांवर ठोस भूमिका घेत नसल्याचा आरोप करत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसह समाजाच्या विविध प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा काँग्रेसतर्फे आंदोलन छेडण्याचा इशारा पुरके यांनी दिला. पत्रकार परिषदेला सीमा तेलंगे, ॲड. अनिल किन्नाके, अजय घोडाम आदी उपस्थित होते.

# उमरखेडमध्ये उपवर्गीकरणाविरोधात एल्गार



प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**उमरखेड** : अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला विरोध करीत बुधवारी (१२ ऑगस्ट) उमरखेडमध्ये हजारो आंबेडकरी अनुयायांनी महामोर्चा काढला. उपवर्गीकरणाची प्रक्रिया तातडीने थांबवावी आणि माजी न्यायमूर्ती अनंत बदर समिती रद्द करावी, या प्रमुख मागण्यांसाठी उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातून निघालेला मोर्चा शहरातील प्रमुख मार्गावरून उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला. यामध्ये बौद्ध समाजबांधवांसह आंबेडकरी विचारांचे समर्थक, महिला,




पुरुष तसेच युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले. मोर्चेकऱ्यांनी विविध घोषणा देत उपवर्गीकरणाच्या निर्णयाला विरोध दर्शविला. यावेळी उपविभागीय अधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

**मुंबईपर्यंत पायी मार्चचा इशारा**

उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द न केल्यास उमरखेड ते मुंबई पायी मार्च काढण्याचा इशारा देण्यात आला. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल तातडीने सार्वजनिक करावा, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी शंकरदादा शेळके यांनी सरकारच्या भूमिकेवर टीका केली. हे आंदोलन कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून सामाजिक सलोखा कायम ठेवत संविधानिक हक्कांसाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनुसूचित जातींमधील ५९ जातींच्या आरक्षणाबाबत सरकारच्या भूमिकेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

मोर्चाला माधव जमदाडे, राजेश्वर पालमकर, मनीष कावळे, माधव वाढवे आदींनी संबोधित केले. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका करीत आगामी काळात मतपेटीतून उत्तर देण्याचा इशारा वक्त्यांनी दिला.

महामोर्चाच्या यशस्वीतेसाठी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सिद्धार्थ दिवेकर यांनी प्रास्ताविक, जॉन्टी विनकरे यांनी सूत्रसंचालन, तर देवानंद पाईकराव यांनी आभार मानले.

# पुसदच्या हत्याकांडाचा उलगडा; आरोपीला ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



**महागाव** : पुसद येथील गंभीर खुनाच्या गुन्ह्यात फरार असलेल्या एका अट्टल व सराईत गुन्हेगाराच्या मुसक्या आवळण्यात महागाव पोलिसांना यश आले आहे. एखाद्या थरारक ॲक्शन चित्रपटाच्या दृश्यालाही मागे टाकेल अशा अतिशय धाडसी व सिनेस्टाईल पद्धतीने महागाव पोलिसांनी फुलसावंगी येथील रेहमान फाट्यावर कारवाई करत या खुन्याला जेरबंद केले.

प्रेम लखू आडे (रा. नारळी) असे आरोपीचे नाव आहे. १० ऑगस्ट रोजी अलका सुखदेव सोयाम रा. वसंतनगर पुसद या महिलेचा मांडवा-सांडवा परिसरात मृतदेह आढळला होता. दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजी पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी महागाव पोलीस स्टेशनच्या पथकाला पुसद येथील खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीचा तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार फुलसावंगी बिटचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) सुनील अंबुरे, बिट जमादार सुहास कायटे, पोलीस शिपाई विशाल गावंडे आणि दीपक माळी यांचे विशेष पथक तातडीने फुलसावंगी कडे रवाना झाले. फुलसावंगी येथे पोहोचताच बिट जमादार यांनी अत्यंत शिताफीने व गुप्तपणे आपल्या गोपनीय बातमीदारांकडून आरोपीच्या हालचालींची खडान्-खडा माहिती मिळवली. आरोपी परिसरात असल्याचे निश्चित होताच पोलिसांनी त्याचा सिनेस्टाईल पाठलाग सुरू केला.

रेहमान फाटा (फुलसावंगी) येथे आरोपी समोर येताच, प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी चालू गाडीचा दरवाजा उघडून काही सेकंदांत खाली उड्या घेतल्या आणि आरोपीला कसलीही संधी न देता जागीच झडप घालून ताब्यात घेतले हे थरारक दृश्य पाहून उपस्थित नागरिकांच्या अंगावर काटा आला.



ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रेम लखू आडे (रा. नारळी) असे आहे. हा आरोपी अत्यंत धोकादायक असून त्याच्यावर यापूर्वीही खुनाचा गंभीर गुन्हा दाखल आहे. तो आधीच एका खुनाच्या प्रकरणात तुरुंगवास भोगून बाहेर आला होता, तरीही त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती कायम होती. महागाव पोलिसांच्या या धडक व धाडसी कारवाईमुळे परिसरात दहशत पसरवणाऱ्या गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते, पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुनील अंबुरे, जमादार सुहास कायटे, पोलीस शिपाई विशाल गावंडे व दीपक माळी यांच्या पथकाने केली आहे.

# आरक्षित भूखंडावर लेआउटचा आरोप; चौकशीची मागणी

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**आर्णी** : शहरातील दाभडी रोड परिसरातील एका लेआउटच्या भूखंड विक्रीवरून प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित जमीन नगरपरिषदेच्या विकास आराखड्यात आरक्षित असल्याचा दावा नागरिकांकडून करण्यात येत असून, अशा परिस्थितीत लेआउटला परवानगी कशी मिळाली, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

शक्तीपीठ महामार्गाच्या प्रस्तावामुळे तसेच शहराच्या वाढत्या विस्तारामुळे आर्णीतील जमिनींच्या किमती वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आरक्षित जमिनीच्या वापरात बदल करून भूखंड विक्री करण्यात आली का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

नगरपरिषदेच्या आरक्षित जमिनीचा वापर बदलण्यासाठी नियमानुसार प्रक्रिया आवश्यक असते. त्यात नागरिकांच्या हरकती व सूचनांचा विचार करून विकास आराखड्यात आवश्यक बदल करण्याची तरतूद आहे. त्यामुळे संबंधित लेआउटसाठी कोणत्या विभागाने आणि कोणत्या कागदपत्रांच्या आधारे परवानगी दिली, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

या प्रकरणात नगरपरिषद, भूमी अभिलेख आणि महसूल विभागातील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबतही आरोप केले जात आहेत. जमिनीच्या नोंदींमध्ये फेरफार झाला आहे का, शासकीय जमिनीचे स्वरूप बदलण्यात आले का, तसेच भूखंड विक्रीचे व्यवहार कायदेशीर आहेत का, याची तपासणी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

या प्रकरणाशी संबंधित व्यक्ती म्हणून गोपाल बोरले यांचे नाव चर्चेत असले, तरी त्यांच्यावरील आरोपांची अधिकृत पुष्टी चौकशीनंतरच होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने कागदपत्रांची तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी. तसेच जमीन आरक्षित किंवा शासकीय असल्याचे निष्पन्न झाल्यास ती शासनाच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# ३५ गोवंशीय जनावरांची सुटका

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



**यवतमाळ** : शहर पोलिसांच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाने कुरेशीपुरा परिसरात कारवाई करून कत्तलीसाठी निर्दयपणे बांधून ठेवलेल्या तब्बल ३५ गोवंशीय जनावरांची सुटका केली. या जनावरांची अंदाजे किंमत सात लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

बुधवारी (१२ ऑगस्ट) दुपारी तीनच्या सुमारास डी.बी. पथक शहर परिसरात गस्त घालत असताना कुरेशीपुरा येथे काही बंद घरांच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याची माहिती मिळाली. पथकाने ही माहिती पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांना दिल्यानंतर त्यांच्या आदेशानुसार तत्काळ कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी कुरेशीपुरा परिसरातील वेगवेगळ्या बंद घरांच्या शेडवर छापा टाकला. यावेळी लहान-मोठ्या ३५ गायी, गोरे व अन्य गोवंशीय जनावरे आढळून आली. पोलिसांनी सर्व जनावरांची सुटका करून त्यांना मोक्षधाम सेवा समिती गोरक्षण येथे सुरक्षित ठेवले.

या प्रकरणी हुसेन कुरेशी कादर कुरेशी, वसीम कुरेशी शेख ख्वाजा कुरेशी आणि मेहबुब कुरेशी फकीर मोहम्मद कुरेशी यांच्याविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा तसेच पशुसंरक्षण कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी आणि पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे प्रगटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक गणेश सपकाळ, पोलीस हवालदार रावसाहेब शेंडे तसेच पोलीस कर्मचारी गौरव ठाकरे, प्रदीप कुरडकर, पवन नांदेकर, मयुर तेल्लेवार, कुणाल पांडे आणि पवन तडसे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# अतिक्रमणावर कारवाई करा; अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**आर्णी** : दुकानाकडे जाणाऱ्या रस्त्यावर करण्यात आलेले अतिक्रमण हटवून संबंधितांवर कारवाई करावी, अन्यथा १४ ऑगस्ट रोजी नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा 'आपना स्टील सेंटर'चे व्यावसायिक फयाज पठाण यांनी दिला आहे.

माहूर रोडलगत असलेल्या दुकानासमोरील अतिक्रमणाबाबत पठाण यांनी २०२२ पासून वेळोवेळी नगर परिषद प्रशासनाकडे निवेदने व अर्ज सादर केले आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ आणि तहसील कार्यालय, आर्णी येथेही निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे. नगर परिषद प्रशासनाकडून संबंधितांना वेळोवेळी नोटिसा बजावण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात अतिक्रमणाची स्थिती कायम असल्याचा आरोप पठाण यांनी केला आहे.



या प्रश्नाबाबत त्यांच्या वडिलांनीही यापूर्वी प्रशासनाकडे निवेदने देऊन कारवाईची मागणी केली होती. मात्र, त्यांच्याही मागणीची दखल घेण्यात आली नाही. अखेर २४ एप्रिल २०२५ रोजी त्यांचे निधन झाले.

फयाज पठाण हे हृदयविकाराचे रुग्ण असून त्यांच्यावर दोन वेळा हृदय शस्त्रक्रिया झाल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. प्रकृतीची अडचण असतानाही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने नाईलाजाने उपोषणाचा निर्णय घ्यावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

१४ ऑगस्ट रोजी नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यापूर्वी प्रशासनाने अतिक्रमणाची पाहणी करून नियमानुसार कारवाई करावी आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात द्यावी, अशी मागणी पठाण यांनी केली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रश्न मार्गी लावावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

# दुकानफोडी उघड; एकाला अटक, दोन विधी संघर्षग्रस्त बालक ताब्यात

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**यवतमाळ** : अवधूतवाडी पोलिसांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी झालेल्या दुकानफोडी व चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या प्रकरणात एका २० वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली असून, दोन विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. चोरीस गेलेला मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली, अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कदम यांच्या नेतृत्वाखाली डीपी पथकाने ही कारवाई केली.

जय भवानी चौकाजवळ भोसा यादव यांच्या दुकानात अज्ञात चोरट्यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी दुकान फोडून चोरी केली होती. याप्रकरणी राखी अनिल यादव (५५, रा. डेअरी डेली न्यूज, देहनकर लेआउट, यवतमाळ) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी दोन विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले. तसेच आकाश सुरेश शेंडे ऊर्फ गामा (२०, रा. पावर हाऊसजवळ, तलावफाईल, यवतमाळ) याला अटक केली. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला २७ ऑगस्ट २०२६ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.तपासादरम्यान चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करून गुन्ह्याची उकल करण्यात आली. ही कारवाई पोलीस निरीक्षक अजित कदम यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र बारड, सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदामवार, सहायक फौजदार सुरेश मेश्राम, पोलीस हवालदार विशाल भगत, बलराम शुक्ला, विठ्ठल चव्हाण, रुपेश ढोबळे, पोलीस शिपाई मोहम्मद भगतवाले, कमलेश भोयर, सचिन राठोड, राज कांबळे, योगेश चोपडे तसेच इतर पोलीस अंमलदारांनी केली.

# आठ तालुक्यांना विकासाची 'आकांक्षा'; पाच कोटींच्या निधीतून बदलाला गती

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**यवतमाळ** : जिल्ह्यातील आठ तालुक्यांच्या विकासाला आता पाच कोटींच्या निधीची साथ मिळणार आहे. राज्य शासनाने संतुलित व सर्वांगीण विकासासाठी विस्तारित आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असून, यवतमाळ जिल्ह्यातील सहा तालुक्यांचा प्रायोगिक तत्त्वावर या कार्यक्रमात समावेश करण्यात आला आहे. यामुळे ग्रामीण भागातील विकासकामांना नवी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

राज्याच्या विस्तारित आकांक्षित जिल्हे व तालुके कार्यक्रमात एकूण १० जिल्ह्यांतील १७७ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर, मारेगाव, महागाव, घाटंजी, उमरखेड आणि दिग्रस या सहा तालुक्यांची एक वर्षासाठी प्रायोगिक तत्त्वावर निवड झाली आहे.

याशिवाय पुसद आणि झरीजामणी या दोन तालुक्यांचा केंद्र शासनाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमात यापूर्वीच समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण आठ तालुके या विकासाभिमुख उपक्रमाच्या कक्षेत आले आहेत.

सन २०२६-२७ मध्ये राज्यातील सर्व १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. प्रत्येक तालुक्याला पाच कोटी रुपयांचा निधी अनुदान स्वरूपात उपलब्ध करून दिला जाणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना अतिरिक्त प्रोत्साहन निधीही पुरस्काराच्या स्वरूपात मिळणार आहे.

नागरिकांचा सक्रिय सहभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील समन्वय, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच स्थानिक घटकांच्या सहकार्याने विकासकामांना गती देण्यावर भर राहणार आहे. त्यामुळे मागास भागातील मूलभूत सुविधा, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक विकासाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांनी ही माहिती दिली.

# मृदा व जलसंधारण कार्यालय उमरखेडातच राहणार

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**उमरखेड** : मृदा व जलसंधारण विभागाच्या प्रस्तावित फेररचनेत उमरखेड उपविभाग इतरत्र जोडला जाण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर आमदार किसनराव वानखेडे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. उमरखेड उपविभाग स्वतंत्रपणे उमरखेड येथेच कायम ठेवण्याचे निर्देश विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांनी दिल्याने उमरखेड-महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सुधारित आकृतीबंधानुसार यवतमाळ जिल्ह्यातील मृदा व जलसंधारण



विभागाच्या उपविभागांची पुनर्रचना प्रस्तावित होती. त्यात उमरखेड उपविभाग इतर उपविभागाशी जोडण्याची शक्यता होती. याची माहिती मिळताच आमदार वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे उमरखेड उपविभाग स्वतंत्र ठेवण्याची मागणी केली. दरम्यान, भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनीही मृदा व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांची भेट घेऊन उमरखेडचे भौगोलिक क्षेत्र मोठे असून, शेतकरी व नागरिकांच्या सोयीसाठी स्वतंत्र उपविभाग आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले. उमरखेड उपविभाग अन्य ठिकाणी जोडल्यास शेतकऱ्यांना प्रशासकीय कामांसाठी दूरवर जावे लागेल. त्यामुळे जलसंधारणाच्या योजनांची अंमलबजावणी आणि प्रशासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता होती. या बाबींचा विचार करून उमरखेड उपविभाग पूर्ववत ठेवण्याचे स्पष्ट करण्यात आले. या निर्णयामुळे उमरखेड-महागाव परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

**यवतमाळ जिल्ह्यातील उपविभागांची रचना**

- १. यवतमाळ – यवतमाळ, बाभूळगाव. २. दिग्रस – दिग्रस, पुसद. ३. उमरखेड – उमरखेड, महागाव. ४. मारेगाव – मारेगाव, वणी. ५. घाटंजी – घाटंजी, आर्णी. ६. नेर – नेर, दारव्हा. ७. राळेगाव – राळेगाव, कळंब. ८. केळापूर – केळापूर, झरी

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# अमरावतीत राष्ट्रीय वस्त्र विद्यापीठ स्थापन करा

## खा. डॉ. अनिल बोंडे यांची केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्याकडे मागणी



प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अमरावती :** विदर्भ हा देशातील प्रमुख कापूस उत्पादक भाग असूनही येथे वस्त्रोद्योग शिक्षण, तंत्रज्ञान आणि संशोधनाचा अपेक्षित विकास झालेला नाही. ही मोठी उणीव भरून काढण्यासाठी अमरावती येथे राष्ट्रीय स्तरावरील वस्त्र विद्यापीठ (National Textile University) स्थापन करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. खा. डॉ. बोंडे यांनी पत्रात नमूद केले की, विदर्भात कापसाचे विपुल उत्पादन होऊनही प्रक्रिया उद्योग आणि उच्च शिक्षण संस्थांच्या अभावामुळे मूल्यवर्धन मर्यादित राहते. यामुळे स्थानिक तरुणांना रोजगारासाठी इतर राज्यांत स्थलांतर करावे लागते. अमरावतीत राष्ट्रीय वस्त्र विद्यापीठ स्थापित झाल्यास टेक्स्टाईल तंत्रज्ञान, फॅशन तंत्रज्ञान आणि वस्त्र क्षेत्रातील संशोधनाला मोठा वेग मिळेल. शिक्षण, संशोधन आणि उद्योग यांच्यात मजबूत ताळमेळ बसवून विदर्भातील “कॉटन टू क्लॉथ” (कपास ते कापड) या संकल्पनेला अधिक सशक्त करता येईल, असा विश्वास खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्यासोबत झालेल्या चर्चेदरम्यान व्यक्त केला.

### अचलपूरच्या फिनले मिलचे पुनरुज्जीवन करा

अमरावतीत वस्त्र विद्यापीठासोबतच अचलपूर येथील बंद पडलेली ऐतिहासिक एनटीसी (NTC) फिनले मिल पुनरुज्जीवित करून तिचे आधुनिकीकरण करण्याची मागणी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी केली आहे. ही मिल विदर्भाच्या औद्योगिक वारशाचा महत्त्वाचा भाग असून, ती पुन्हा सुरू झाल्यास स्थानिक कामगार, विणकर आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना थेट रोजगाराचा व आर्थिक लाभाचा मार्ग उपलब्ध होईल, असे त्यांनी पत्रात नमूद केले.

### ‘पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क’च्या कामाला गती द्या

खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिलेल्या पत्रात अमरावती येथील मंजूर ‘पीएम मित्रा’ (PM MITRA) टेक्सटाईल पार्कच्या कामाला गती देण्याची मागणी केली आहे. जमिनीचे वाटप, पायाभूत सुविधांचा विकास आणि पर्यावरणविषयक मंजुऱ्यांची प्रक्रिया वेगाने पूर्ण करून या प्रकल्पाचे काम वेळेत सुरू करावे, जेणेकरून मोठ्या प्रमाणावर खाजगी गुंतवणूक आकर्षित होऊन स्थानिक तरुण व महिलांना रोजगाराच्या संधी मिळतील, असे खा. बोंडे यांनी स्पष्ट केले.

# चिखलदऱ्यात कोट्यवधींचे सुसज्ज बसस्थानक कुलूपबंद

## अमरावतीहून थेट नियमित बससेवा नसल्यामुळे पर्यटक संतप्त

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



**चिखलदरा :** विदर्भाचा नंदनवन, थंड हवेचं ठिकाण आणि लाखो पर्यटकांचं आकर्षण असलेल्या चिखलदऱ्याला जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अमरावती शहरातून थेट एसटी बससेवा नसल्याची विसंगत परिस्थिती आहे. अमरावती जिल्ह्यातील अकरा तालुक्यांपैकी चिखलदरा वगळता इतर तालुक्यांशी अमरावतीची एसटी सेवा उपलब्ध आहे. परंतु, चिखलदरासाठी अमरावती मध्यवर्ती आगारातून नियमित बस फेरी नाही. विशेष म्हणजे चिखलदऱ्यात प्रवाशांसाठी सुसज्ज बस स्थानक उभारण्यात आलंय. तरीही या बस स्थानकातून अमरावतीकडं जाणाऱ्या बसचा अभाव असल्यामुळं प्रवाशांसह पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.चिवखलदरा इथं राज्य परिवहन महामंडळांना अत्यंत सुसज्ज बस स्थानकाची इमारत उभारली आहे. कार्यालय, चौकशी कक्ष, चालक वाहक विश्रांती गृह, हिरकणी धर कक्ष ,यासारख्या सुविधा इथं उपलब्ध केल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात या सुविधांचा वापर कितपत होतो? हा प्रश्नच आहे. बस स्थानकाचा कारभार परतवाडा आगारातून चालत असल्यामुळं चिखलदऱ्यात उभारलेल्या या इमारती अनेक सुविधा कुलूप बंद अवस्थेत आहेत. एकीकडं लाखो रुपये खर्च करून उभारलेली पायाभूत सुविधा आणि दुसरीकडं तिचा पुरेसा वापर नसल्याचं ? चित्र दिसत आहे. त्यामुळं एसटी महामंडळाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. एसटी महामंडळाच्या वतीनं विविध सामाजिक घटकांना देण्यात येणाऱ्या प्रवासी भाड्यातील सवलतीचा मोठा तक्ताही बस स्थानकावर लावला आहे. या तक्त्यात तब्बल ४३ प्रकारच्या सवलतींचा उल्लेख आहे. त्यापैकी १८ सवलती १०० टक्के असल्याचं नमूद आहे. इतर सवलती ७०, ५०, ४५ आणि ३० टक्के अशा विविध प्रमाणात असल्याचं फलकावर दर्शवलं आहे. प्रवाशांच्या हितासाठी सवलतीची एवढी मोठी व्यवस्था चिखलदरा बस स्थानकावर आवडेल तिथं प्रवास योजनेसह विविध पाच योजना आणि प्रवासी सवलतींचे फलक लावले आहेत. महाराष्ट्र तसंच आंतरराज्य प्रवासासाठी सात दिवसांच्या पाचपासून मासिक पास आणि त्रैमासिक पासपर्यंतच्या योजनांची माहिती या फलकावर दिली आहे. प्रौढ आणि लहान मुलांसाठी साध्या तसंच शिवशाही बसच्या पासचे दर विविध कालावधीच्या पाच योजना यांची माहिती प्रवाशांसाठी दिली आहे.

# अमरावतीत ‘हर घर तिरंगा’अंतर्गत भव्य तिरंगा रॅली

## हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

प्रतिनिधी १३ ऑगस्ट




**अमरावती:** देशभक्तीची भावना जनमानसात जागृत करण्यासह राष्ट्रध्वज तिरंग्याबद्दल आदर, अभिमान आणि आत्मीयता निर्माण करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने ‘हर घर तिरंगा’ उपक्रमांतर्गत बुधवारी (दि. १२ ऑगस्ट) भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. दुपारी ४ वाजता नेहरू मैदान येथून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली. रॅलीने राजकमल चौक, जयस्तंभ चौक, मालवीय चौक आणि इर्विन चौक मार्गे शहरातून मार्गक्रमण करत संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे समारोप केला. रॅलीदरम्यान जयस्तंभ चौक येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच इर्विन चौक येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रॅलीमध्ये हजारो अमरावतीकरांसह महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी, व्यापारी, विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तिरंगा हातात घेऊन देशभक्तीच्या घोषणांनी भारावलेल्या वातावरणात निघालेल्या या रॅलीने शहरात राष्ट्रप्रेमाचा उत्साह निर्माण केला. यावेळी उपस्थितांनी तिरंगा प्रतिज्ञा तसेच अवयवदानाची शपथ घेतली. विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. रॅलीच्या समारोपावेळी रंगीबेरंगी तिरंगा फुगे आकाशात सोडण्यात आले. ‘हर घर तिरंगा’ उपक्रमांतर्गत १२ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, तिरंगा रॅली हा त्यातील महत्त्वाचा उपक्रम ठरला. राष्ट्रध्वजाबद्दलचा आदर, अभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात रॅली यशस्वी ठरली. महापौर श्रीचंद तेजवानी यांनी अमरावतीकरांना ‘हर घर तिरंगा’ उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले.

# “संवादातून प्रत्येक समस्येचे समाधान होते” : आचार्य देवेंद्र जैन महाराज

## देहरादून येथे ‘संवाद से समाधान’चा भव्य सोहळा; सामाजिक समरसता व राष्ट्रीय एकात्मतेवर विचारमंथन

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



**अमरावती:** समाजातील वाढती वैचारिक आव्हाने, सामाजिक समरसता, राष्ट्रीय एकात्मता तसेच वैश्विक सद्भावना अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने महावीरायतन फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय उपक्रम ‘संवाद से समाधान चा भव्य कार्यक्रम ४ ऑगस्ट २०२६ रोजी लोक भवन, देहरादून (उत्तराखंड) येथे उत्साहात पार पडला.

यावेळी मार्गदर्शन करताना आचार्य देवेंद्र जैन महाराज यांनी “संवादातून प्रत्येक समस्येचे समाधान होते” असे प्रतिपादन केले. समाजातील कोणत्याही समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी परस्पर संवाद, विश्वास, सहकार्य आणि सकारात्मक विचारांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. भगवान महावीरांचा ‘जगा आणि जगू द्या’ हा संदेश आजच्या काळात अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महावीरायतन फाउंडेशनच्या ‘संवाद से समाधान’ या राष्ट्रीय उपक्रमाचा उद्देश समाजातील विविध घटकांना एका व्यासपीठावर आणून संवाद, सहकार्य आणि सामूहिक विचारमंथनाच्या माध्यमातून वर्तमानातील सामाजिक आव्हानांवर सकारात्मक व कायमस्वरूपी उपाय शोधणे हा आहे. या उपक्रमातून ‘वसुधैव कुटुंबकम्’, ‘जगा आणि जगू द्या’ तसेच ‘एक भारत-समरस भारत-सशक्त भारत’ या विचारांचा प्रसार करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाला उत्तराखंडचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल गुरमीत सिंह (सेवानिवृत्त) यांचे प्रमुख आतिथ्य लाभले. भगतसिंह कोश्यारी, माजी राज्यपाल महाराष्ट्र व गोवा तसेच माजी मुख्यमंत्री उत्तराखंड, हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच महंत लोकेश दास महाराज, पीठाधीश्वर, स्वामी जगन्नाथ आश्रम, ऋषिकेश यांचे पावन सान्निध्य लाभले.

# हेड कॉन्स्टेबल अमित खांडारे यांची आत्महत्या

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अमरावती:** सिटी कोतवाली ठाण्यात कार्यरत हेड कॉन्स्टेबल अमित खंडारे यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली.



* त्यांनी गुरुकृपा कॉलनी, वडाली कॉम्प्लेक्स येथील आपल्या घरी गळफास घेतला. * अमित खांडारे हे सिटी कोतवाली येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते.
* १९ जून रोजी त्यांची वाहतूक शाखेतून सिटी कोतवाली येथे बदली झाली होती आणि २२ जून रोजी ते पोलीस मुख्यालयात ट्रेनिंग साठी गेले होते. ते गुरुकृपा कॉलनीतील एका घराच्या पहिल्या मजल्यावर पत्नी आणि दोन मुलांसोबत राहत होते.

त्यांची पत्नी, शिक्षिका आहे, आज सकाळी साडेसात वाजता मुलांसोबत शाळेसाठी निघाल्या. पत्नी आणि मुले शाळेसाठी गेल्यानंतर लगेचच अमित खांडारे यांनी आत्महत्येचे पाऊल उचलले; आत्महत्या का केली हे कळू शकले नाही. याचे कारण अज्ञात आहे. फ्रेझरपुरा पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत; या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

# महाराष्ट्रातील गाडगेबाबा च्या सेवकांची बापूसाहेब देशमुख यांना श्री क्षेत्र ऋणमोचन येथे श्रद्धांजली

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



**दर्यापूर :** गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष तथा श्रीक्षेत्र नागरवाडी चे इंद्रभुवन निर्माते निस्वार्थ शिवा देणारे स्व. उत्तमराव उर्फ बापूसाहेब देशमुख यांना महाराष्ट्रातील विविध संस्थांचे प्रतिनिधी यांच्या वतीने गाडगेबाबांची कर्मभूमी श्री क्षेत्र ऋणमोचन येथे श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती चे माजी संचालक सुमंतराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली तर त्यांचे मोठे बंधू गोपाळराव देशमुख गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली बापू साहेबांच्या सेवा कार्यावर प्रकाश टाकण्यात आला त्याप्रसंगी श्रीक्षेत्र तुळजापूर येथे आई तुळजा भवानी तीर्थक्षेत्र मंदिराचे मुख्य भोपे पुजारी, श्रीमान दिलीप रावजी कदम, श्री सयाजीराव साठे, जाधव मोहोळ सोलापूर, बापू साहेबांचे चिरंजीव श्री सागर देशमुख, प्रकाश महात्मे व्यवस्थापक अमरावती, प्रशांत देशमुख दादर मुंबई, गजाननराव जंजाळ अमरावती, कुणाल देशमुख नाशिक, किशोर चौधरी गुरुजी अमरावती, प्रवीण उर्फ बाळासाहेब देशमुख वरवंडी, डॉ बाळासाहेब कावरे, पवनराव देशमुख शिराळा, वसंतराव देशमुख लोहारेकर व्यवस्थापक श्रीक्षेत्र ऋणमोचन, योगेश देशमुख पुणे, प्रशांतराव देशमुख अमरावती, अभिजीत कदम अभिजीत राव कदम कवठळ, उदयराव देशमुख तेल्हारा, राजेंद्र देशमुख नागपूर, संजय देशमुख तेलारा, राजेंद्र देशमुख पातुर, हर्षित देशमुख अमरावती, रविराज देशमुख सोनाळा, अरुण भाऊ पवार सातेगाव ,बबनराव देशमुख शिरसो, विठ्ठलराव तेलमोरे दापुरा, दिनेश पाटील वानखडे, माणिक नवघरे , विठ्ठल विठ्ठल राव देशमुख ऐरोली मुंबई, रामेश्वर भाऊ मोरे, गजानन देशमुख दर्यापूर, आधीच्या उपस्थितीत भावपूर्व श्रद्धांजली. अर्पण करण्यात आली व त्याच वेळेस 16 ऑगस्टला श्री गाडगे महाराज समाधी मंदिर सभागृह येथे दुपारी अडीच वाजता शोकसभेचे आयोजन करण्यात आल्याचे प्रकाश महात्मे यांनी जाहीर केले.

# अमरावतीत 14 ऑगस्टला ‘विभाजन विभीषिका स्मृती दिवस’ कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अमरावती :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी, विदर्भ सिंधी विकास परिषद व महिला मंच यांच्या संयुक्त सहकार्याने ‘विभाजन की विभीषिका स्मृती दिवस’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे हा कार्यक्रम भव्य स्वरूपात होणार असल्याची माहिती विदर्भ सिंधी विकास परिषदेचे अध्यक्ष तुलसी सेतिया यांनी दिली. विभाजनाच्या काळातील वेदना आणि त्यागाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी कार्यक्रमात सिंधी नाटक, डॉक्युमेंटरी फिल्म तसेच देशभक्तिपर गीतांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान संत कंवरराम साहिब यांचे गादीदीन संत साई राजेशलाल साहिब भूषविणार आहेत.

यावेळी विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार असून अमरावतीतील कलाकारही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. विभाजनाच्या विभीषिकेवर आधारित ‘हीड मुहिंजो वतन’ या नाटकाचेही मंचन करण्यात येणार आहे. या नाटकासाठी ऑडिओ रेकॉर्डिंग व संगीत गिरीश नारायण यांचे आहे. विदर्भ सिंधी विकास परिषद महिला मंचाच्या अध्यक्षा राजकुमारी झांबानी यांच्या माहितीनुसार, लहूज यांच्या वेदनादायी दास्तानावर आधारित डॉक्युमेंटरी फिल्मही दाखविण्यात येणार आहे. तसेच सिंधी व हिंदी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मुथूट फिनकॉर्प गैरव्यवहार प्रकरणात महिला कॅशियरला अटकपूर्व जामीन

## अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

**अमरावती :** अमरावती येथील मुथूट फिनकॉर्पमधील कथित गैरव्यवहाराच्या प्रकरणात कार्यरत असलेल्या महिला कॅशियर यांना आज अमरावती येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला. सदर प्रकरणात महिला कॅशियर यांच्यावर आर्थिक गैरव्यवहारासंदर्भात आरोप करण्यात आले होते. या प्रकरणाच्या अनुषंगाने त्यांना अटक होण्याची शक्यता असल्याने त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. आरोपी कॅशियर महिला यांच्या वतीने ॲड. स्वप्रील बारब्दे व ॲड. अनिरुद्ध लढ्ढा यांनी न्यायालयासमोर प्रभावीपणे बाजू मांडली. सुनावणीदरम्यान आरोपीची कथित भूमिका, उपलब्ध कागदपत्रे, तपासातील आवश्यक बाबी तसेच अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासंदर्भातील विविध कायदेशीर मुद्दे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती यांनी आरोपी कॅशियर महिला यांना अटकपूर्व जामीन मंजूर करण्याचा आदेश दिला. या प्रकरणात महिला आरोपीच्या वतीने ॲड. स्वप्रील बारब्दे व ॲड. अनिरुद्ध लढ्ढा यांनी केलेल्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपीला अटकपूर्व जामीन मिळाला आहे.

# जाहीर नोटीस

प्रो. नं. १९५०/२०२६ दिवाणी न्यायालय व. स्तर,
दर्यापूर दि. १०/०८/२०२६

वि. दिवाणी न्यायालय (व. स्तर) दर्यापूर जि. अमरावती येथील ए. एम. जोशी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र. २७१/२०२६** **ने.ता. ०३/०९/२०२६**

**अर्जदार:** **१) कलावती पुर्णाजी धांदे**, वय अं. ७९ वर्ष, धंदा- घरकाम
**२) नारायण पुर्णाजी धांदे**, वय अं. ६४ वर्ष, धंदा- मजुरी
दोन्ही रा. रमाबाई आंबेडकर नगर, बनोसा, ता. दर्यापूर जि. अमरावती

**-- विरूद्ध ----**

**गैरअर्जदार:**

**निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **पुर्णाजी सीतारामजी धांदे** हे दि. ११/०१/१९९८ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VII) १८२७चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. १०/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक( प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व. स्तर दर्यापूर**

# रानभाजी महोत्सवा’चे आज आयोजन

## नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अमरावती :** मानवी आरोग्यामध्ये रानभाज्यांचे असलेले महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने 13 ऑगस्ट रोजी बळीराजा सभागृह, कृषी संकुल, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, विद्यापीठ रोड येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

रानभाज्या जंगलात आणि शेताच्या बांधावर नैसर्गिकरित्या उगवतात. रानपालेभाज्या, फळभाज्या आणि कंदभाज्यांमध्ये भरपूर पौष्टिक घटक असतात.या भाज्यांवर कोणत्याही रासायनिक कीटकनाशकांची किंवा बुरशीनाशकांची फवारणी केली जात नाही.

या महोत्सवात रानभाज्यांची वैशिष्ट्ये, त्यांचे संवर्धन आणि विविध पाककृतींची (रेसिपी) सचित्र माहिती दिली जाणार आहे.




ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना रानभाज्यांच्या आरोग्यदायी फायद्यांची माहिती देणे आणि रानभाज्यांसाठी थेट विक्री व्यवस्था (मार्केट चेन) निर्माण करून शेतकऱ्यांना आर्थिक नफा मिळवून देणे हा या महोत्सव आयोजनामागील उद्देश असल्याचे तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने यांनी सांगितले आहे.

सन 2020-21 पासून दरवर्षी 9 ते 15 ऑगस्ट या कालावधीत हा रानभाजी महोत्सव साजरा केला जातो. याही वर्षी अमरावती तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शासकीय विभागीय ग्रंथालयात ‘ग्रंथपाल दिन’साजरा

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अमरावती:** भारतातील ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमित्त शासकीय विभागीय ग्रंथालयात आज ‘ग्रंथपाल दिन’ साजरा करण्यात आला.

ग्रंथपाल दिनाच्या औचित्याने विभागीय ग्रंथालयात ग्रंथालय शास्त्राशी संबंधित विविध पुस्तक व ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी रितेश भुयार यांच्या हस्ते करण्यात आले. शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ.राजेश पाटील यांच्यासह अधिकारी-कर्मचारी व ग्रंथालयाच्या अभ्यासिकेतील विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. ग्रंथापाल दिनाच्या औचित्याने ग्रंथालय शास्त्राची पाच सुत्रे आणि ग्रंथ व ग्रंथालयाच्या मानवी जीवनातील महत्वावर यावेळी प्रातिनिधीकपणे विद्यार्थीनीने मनोगत व्यक्त केले.

# महिन्याला 900 टन कचरा संकलन; प्रक्रियेला मात्र मर्यादा, विल्हेवाटचा प्रश्न !

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

## संकलित कचऱ्यापैकी निम्म्याच कचऱ्यावर प्रक्रिया



**खामगाव :** शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज हजारो किलो कचरा संकलित केला जात असला, तरी त्याच्या शास्त्रोक्त प्रक्रियेचे आव्हान अद्याप कायम आहे. खामगाव शहरातून महिन्याला तब्बल ८०० ते ९०० टन कचरा संकलित केला जातो; मात्र यापैकी अंदाजे ४०० टन कचऱ्यावरच प्रक्रिया केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उर्वरित कचऱ्याचे काय होते, हा प्रश्न आता शहराच्या स्वच्छते सोबतच पर्यावरणाच्या दृष्टीनेही गंभीर बनला आहे. दररोज सरासरी २५ ते ३० टन कचरा संकलित होत असताना कचरा डेपोवर आवश्यक संसाधने आणि सुविधा अपुऱ्या पडत असल्याची स्थिती आहे. कचरा व्यवस्थापनाची मोठी जबाबदारी कामगारांच्या खांद्यावर असली, तरी त्यांना आवश्यक साधनसामग्रीचा अभाव जाणवत असल्याने कामगारांमध्ये नाराजी वाढत आहे.

कचरा संकलनासाठी वापरण्यात येणाऱ्या घंटागाड्यांच्या देखभाल-दुरुस्तीचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. वाहनांमध्ये बिघाड झाल्यास कचरा संकलनाच्या दैनंदिन व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. परिणामी, शहरातील कचरा व्यवस्थापनाची संपूर्ण यंत्रणा केवळ उपलब्ध मनुष्यबळा वर आणि मर्यादित संसाधनां वर सुरू असल्याचे चित्र आहे. महिन्याला कचरा व्यवस्थापनावर लाखो रुपये खर्च होत असतानाही कचऱ्याची पूर्ण क्षमतेने प्रक्रिया होत नसेल, तर या व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. प्रशासनाने कचरा डेपो वरील अपुऱ्या संसाधनांची तातडीने पूर्तता करून घंटा गाड्यांची नियमित देखभाल-दुरुस्ती आणि कचऱ्यावर शंभर टक्के प्रक्रिया करण्यासाठी नियोजन करणे गरजेचे आहे. त्यामुळे शंभर टक्के शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे

# आर्थिक व्यवहारांवरील निर्बंध हटवा, शेगाव तालुक्यातील ग्रा.पं. प्रशासकांची मागणी

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



**शेगाव :** ग्रामपंचायतींच्या आर्थिक व्यवहारांवर निर्बंध घालण्यात आल्याने शेगाव तालुक्यातील ग्रामपंचायत प्रशासकां मध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. गावातील अत्यावश्यक विकासकामे आणि नागरी सुविधा प्रभावित होत असल्याचा आरोप करत ग्रामपंचायतींच्या प्रशासकांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे गटविकास अधिकारी यांचे मार्फत १२ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे तातडीने आर्थिक व्यवहारांना परवानगी देण्याची मागणी केली आहे. अन्यथा प्रशासक पदाचा सामूहिक राजीनामा देऊन ग्रामपंचायतींच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, सध्या ग्रामपंचायतींमध्ये मोठे आर्थिक व्यवहार करू नयेत, असे स्पष्ट आदेश असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आर्थिक अधिकार नसल्यामुळे गावातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, पथदिवे, स्ट्रीट लाईट, १५ वा वित्त आयोग, जन सुविधेची कामे, अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांचा विकास तसेच आपत्कालीन स्वरूपाची कामे पूर्ण करताना अडचणी येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. नागरिकांच्या समस्या थेट प्रशासकां समोर येत असून, आर्थिक अधिकार नसल्याने त्यांचे निराकरण करणे कठीण जात असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे.

### गावातील विकासकामे ठप्प

» झाल्याने प्रशासक म्हणून कामकाज पाहणे अत्यंत कठीण झाले असून, त्यामुळे गावात तीव्र असंतोष निर्माण होत आहे. त्यामुळे गावातील अत्यावश्यक आणि नागरी सुविधांशी संबंधित कामांसाठी आवश्यक ते आर्थिक व्यवहार करण्याची विशेष परवानगी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरून तातडीने देण्यात यावी, असे निवेदनात नमूद आहे. या निवेदनावर ज्ञानेश्वर शेजोळे, केशव हिंगणे, कल्पना विजय तायडे, लक्ष्मणराव गवई, श्रद्धा योगेश पिसे, शीतल अमोल भांगे, शारदा गजानन ससे, पवन बरिंगे, अमोल ज्ञानदेव गोळे, महेंद्र भोजने, पल्लवी खोंड, सुनीता आत्माराम वानखडे, अरुणा बोबडे यांच्या सह्या आहेत.

# श्री सत्यसाईबाबांच्या पावन पादुकांचे जळगाव जामोद प्रस्थान !

प्रतिनिधी १३ ऑगस्ट




**जळगांव जामोद :** श्री सत सत्यसाईबाबांच्या पावन पादुकांचे दर्शन प्रेम वाहिनी रथ दिनांक ११ ऑगस्ट गुरुवार रोजी जळगांव जामोद येथील गजानन महाराज मंदिरापासून देवाशिष लॉन पर्यंत श्रीराम उपासना बहुउद्देशीय भजनी संस्था, यांनी भजन, अभंग, गौळणी गायन करीत वैष्णवी नृत्य सादर केले भगवान अतकरे, प्रमोद मिरगे, सुरेश गोंड, निवृत्ती कळमकर दशरथ बोंबटकर प्रकाश दंडे, सौ.नंदाबाई अतकरे, चंद्रकला दाते निर्मला मुरांडे,लीलाबाई कोथळकर यासह सर्व सदस्य व साई भक्तांनी सह मुक्कामी दर्शनासाठी होता , १२ऑगस्ट २०२६ बुधवार रोजी सकाळी ८:०० वाजता देवाशिष लॉन वरून गजानन महाराज मंदिर रोड, डिपी रोड, दुर्गा चौक , महासिध्द अर्बन बॅंक, नांदुरा अर्बन बॅंक , जुना बाजार उमाळे हॉस्पिटल विविध ठिकाणी रस्त्यावर रांगोळ्या व पुजन तसेच माळीखे भागातील महिला, पुरूष यांनी पादुका विविधवत पुजन,पुष्पहार अर्पण केले , महासिध्दिमहाराज मंदिर रोड, उटी, वंडसिगी , येनगांव मार्गांवरून शोभायात्रा रथ जळगांव जामोद साई भक्तांनी पुढील कार्यक्रम, प्रवासाठी निरोप दिला.

# मजूरटंचाईने शेतकऱ्यांची कोंडी; खुरपणीसाठी 400 रुपये रोज !

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**खामगाव :** ग्रामीण भागात खरीप हंगामातील शेतीच्या कामांना सध्या वेग आला असून, सोयाबीन, कपाशीसह विविध पिकांमध्ये खुरपणी, डवरणी आणि इतर आंतरमशागतीची कामे सुरू आहेत; मात्र या कामांसाठी आवश्यक मजुरांची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. मजुरांची मागणी वाढल्याने मजुरीचे दरही वाढले असून, खुरपणीच्या कामासाठी महिला मजुरांना दिवसाला सुमारे ४०० रुपये मजुरी द्यावी लागत आहे. पावसामुळे पिकांची वाढ वेगाने होत असतानाच तणांचाही प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी वेळेत खुरपणी करणे आवश्यक झाले आहे; मात्र उपलब्ध मजुरांच्या तुलनेत कामाची मागणी अधिक असल्याने मजूर मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना धावपळ करावी लागत आहे. काही ठिकाणी मजूर आधीच निश्चित केले जात असल्याने ऐनवेळी मजूर उपलब्ध होत नाहीत. मजुरीचे दर वाढल्याने एकूण उत्पादन खर्चातही वाढ झाली आहे. एकीकडे शेतीमालाच्या बाजार भावाबाबत अनिश्चितता कायम असताना दुसरीकडे मजुरी, खते, कीटकनाशके आणि इतर निविष्ठांच्या वाढत्या खर्चाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मजूरटंचाई आणि वाढती मजुरी ही खरीप हंगामातील शेतकऱ्यां समोरील आणखी एक महत्त्वाची समस्या ठरत आहे.

# बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांवर सोशल मीडियातून आरोप; रोहित पगारीयाविरुद्ध पोलिसांत तक्रार

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**खामगाव :** खामगाव-कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिकारी, कर्मचारी व चपराशांविरुद्ध सोशल मीडियावर अश्लील भाषा वापरून बदनामीकारक आरोप केल्याप्रकरणी रोहित पगारीया याच्याविरुद्ध बाजार समितीच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी खामगाव शहर पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डात दर गुरुवारी गुरांचा बाजार भरतो. बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या तसेच विक्री झालेल्या जनावरांच्या नोंदी ठेवल्या जातात. तसेच इअर टॅगशिवाय जनावरांच्या खरेदी-विक्रीस मनाई असून, बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी नियमानुसार प्रक्रिया राबवत असल्याचे तक्रारदारांनी नमूद केले आहे. दरम्यान, ५ ऑगस्ट २०२६ रोजी रोहित पगारीया याने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर व्हिडीओ प्रसारित केल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये बाजार समितीच्या अधिकारी, कर्मचारी व चपराशांविरुद्ध अश्लील व अपमानास्पद भाषा वापरण्यात आल्याचे तसेच जनावरांच्या खरेदी-विक्रीत अनियमितता होत असल्याचे आरोप करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. बाजार समितीतील संबंधितांकडून आर्थिक व्यवहार होत असल्याचे, जनावरांची नियमबाह्य विक्री केली जात असल्याचे तसेच बाजार समितीचा परिसर कसायांची मंडी बनल्याचे आरोप व्हिडीओत करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.पोलिस प्रशासनाविषयीही आक्षेपार्ह वक्तव्ये यासोबतच करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

कोणतीही अधिकृत माहिती किंवा पुरावे नसताना सोशल मीडियाच्या माध्यमातून अशा प्रकारचे आरोप करण्यात आल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदनामी होत असल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. संबंधित व्हिडीओच्या आधारे रोहित पगारीयाविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील लागू तरतुदींनुसार कारवाई करावी, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली आहे.

# खामगाव येथे श्री संत नामदेव महाराज संजिवन समाधी सोहळा उत्साहात साजरा

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

खामगाव : श्री संत शिरोमणी नामदेव महाराज स्मारक समिती, खामगांव, जि.बुलडाणा यांचे माध्यमातून श्री संत शिरोमणी नामदेव महाराज ६७६ वा संजिवन समाधी सोहळा श्री संत नामदेव मंदीर, गोपाळ नगर खामगांव येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि.९ ऑगष्ट रोजी सकाळी श्रींचा अभिषेक व पुजाअर्चना, हरीनाम, आरती करण्यात आली. दुपारी २ वाजेपासून श्री वैष्णव शिंपी समाज महिला मंडळाचे वतीने भजन किर्तन व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिलांकरीता व लहान मुलांकरीता विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी महिला मंडळाच्या वतीने आरती करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. दि.१० ऑगष्ट रोजी सकाळी श्रींची पुजा अर्चना व नंतर हभप श्री मुरलीधरजी वाघ महाराज यांचे काल्याचे किर्तन संपन्न झाले. यावेळी कृष्ण व राधाच्या वेशभुषेत आलेल्या बालकांच्या हस्ते दहिहांडी फोडण्यात आली. त्यानंतर महिला मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षीसाचे वितरण करण्यात आले. नंतर उपस्थित समाजबांधवांनी प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी खामगांव शहराच्या नगराध्यक्षा मा.सौ. अपर्णाताई फुंडकर, नगरसेवक मा.श्री राकेश राणा, नगरसेविका मा.सौ.शारदाताई पारखे, मा.सौ. ज्योतीताई भुसारी यांच्यासह अनेक मान्यवरांनी श्री संत नामदेव मंदीर येथे भेटून देवुन दर्शनाचा लाभ घेतला. दुपारी ४ वाजता श्री संत नामदेव महाराजांच्या पालखीची शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी श्रींच्या पालखीचे जागोजागी स्वागत करण्यात आले. शोभायात्रेदरम्यान सहभागी महिलांनी अत्यंत उत्साहाने पावली फुगडी खेळून भजन व किर्तन केले. सायंकाळी श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या समक्ष भारूडचा कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थित लहान बालके, महिला भगिणी व समाजबांधवांनी पावली खेळून आपला आनंद द्विगुणीत केला. यावेळी कार्यकारी अभियंता मा.श्री. एकनाथजी तळेले, सहा.अभियंता श्रेणी १ मा.श्री प्रविणजी पुंडकर यांनी सुध्दा अत्यंत उत्साहाने पावली खेळून आपली उपस्थिती दर्शविली. तसेच जिल्हा प्रमुख सरसंघचालक मा.श्री बाळासाहेबजी काळे, शहर प्रमुख सरसंघचालक मा.श्री प्रल्हादजी निमकंडे, स्वयंसेवक मा.श्री संजयजी इंगळे, मा.श्री एकनाथराव फुंडकर, मा.श्री गणेशजी चौकसे, मा.श्री विजयजी महर्षी, मा.श्री संतोषजी वर्मा व इतर मान्यवर मंडळींनी उपस्थिती दर्शवून सोहळ्याचा आनंद द्विगुणीत केला. कार्यक्रमासाठी श्री संत शिरोमणी नामदेव महाराज स्मारक समिती, श्री वैष्णव शिंपी समाज महिला मंडळ व श्री वैष्णव शिंपी समाज युवक मंडळ यांनी अथक परिश्रम घेतले. श्री संत नामदेव महाराज यांचा संजिवन समाधी सोहळा श्री वैष्णव शिंपी समाज बांधवांच्या सहकार्याने संपन्न झाला.

# पीएचडी'च्या वाटेवर विद्यार्थ्यांसाठी शासनाचा अडथळा; बार्टीचा 300 जागांचा कोटा पूर्ववत करण्याची मागणी

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

## कृती समितीचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**खामगाव :** अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना पीएचडी संशोधनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या फेलोशिपमधील ३०० जागांचा कोटा पूर्ववत करावा, तसेच पीएचडीसाठी असलेली ३५ वर्षांची वयोमर्यादा रद्द करावी, या मागण्यांसाठी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणविरोधी कृती समितीच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना दि. १२ ऑगस्ट रोजी निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, बार्टीच्या माध्यमातून अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सवलती दिल्या जातात. पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही फेलोशिपची तरतूद करण्यात आली होती. यापूर्वी अनुसूचित जातीतील ५९ प्रवर्गातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी एकत्रितपणे ३०० जागांचा कोटा निर्धारित होता; मात्र २०२६ च्या शैक्षणिक धोरणात बदल करून हा कोटा १०० जागांवर आणण्यात आल्याचा दावा कृती समितीने केला आहे. निवेदनावर गौतम गवई, दादाराव हेलोडे, अंबादास वानखडे, योगेंद्र गवारगुरु, नीलकंठ सोनोने, डॉ. संतोष तायडे, प्रीतम माळवंदे, रवीभाऊ माळवंदे, नानाभाऊ हिवराळे, मनोज पानझाडे, विजय बोदडे, संजयभाऊ खंडेराव, राहुल तायडे, जगन्नाथ शेगोकार, धनंजय माने, डॉ. ज्ञानेश्वर रावणकार, जुगल सिसोदिया, भीमराव सोनोने, वानेरे सर, गजानन तायडे, भारत दामोदर, मधुकर भगत, गणेश पानझाडे, वसंतराव वाकोडे, सत्यशील वाकोडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### संशोधनाची संधी!

» २०० जागांची कपात झाल्याने अनुसूचित जातीतील संशोधक विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय पीएचडीसाठी विद्यार्थ्यांना ३५ वर्षांची वयोमर्यादा घालण्यात आल्याने अनेक विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी मिळणार नाही. ही वयोमर्यादा तातडीने रद्द करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# खामगाव बसस्थानक परिसर खड्डेमय; चालक, प्रवासी वैतागले!

## पावसाळ्यात अपघाताचा धोका वाढला!



प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**खामगाव :** येथील बसस्थानक परिसराची दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे बसचालक, प्रवासी तसेच परिसरातून ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचून ठिकठिकाणी डबकी तयार होत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. बसस्थानक परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात बसची ये-जा तसेच प्रवाशांची वर्दळ असते. बसस्थानकात प्रवेश करताना आणि बाहेर पडताना चालकांना खड्ड्यांमधून मार्ग काढावा लागत आहे. पावसाचे पाणी साचलेल्या खड्ड्यांचा अंदाज न आल्याने वाहनांचे नुकसान होण्याची शक्यताही निर्माण झाली आहे, तसेच पाण्यामुळे चिखल निर्माण होत असल्याने प्रवाशांना बसपर्यंत पोहोचताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. बसस्थानक हा शहरातील महत्त्वाचा सार्वजनिक वाहतूक केंद्रबिंदू असल्याने त्याच्या परिसरातील रस्त्यांची नियमित देखभाल होणे अपेक्षित आहे; मात्र सध्या संपूर्ण परिसर खड्डेमय झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

### दुरुस्तीची मागणी

» पावसाळ्यात समस्या अधिक गंभीर होण्यापूर्वी बसस्थानक परिसरातील खड्डे तातडीने बुजवावेत, तसेच रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत आहे. संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

# सहा महिन्यांपासून नवीन 'गॅस कनेक्शन'चा खोळंबा; ग्राहक त्रस्त !

## आखाती देशातील युद्धा पासून नोंदणी प्रक्रिया बंद : निर्बंध हटले, तरी नवीन जोडणी चा निर्णय नाही!

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**खामगाव:** इंधन पुरवठ्या वरील निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर मागील सहा महिन्यांपासून नवीन घरगुती एलपीजी गॅस जोडणी देण्याची प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नसल्याने ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे. नवीन गॅस कनेक्शन साठी इच्छुक ग्राहकांची सध्या केवळ नोंदणी करून घेतली जात असून, प्रत्यक्ष जोडणी कधीपासून देण्यात येईल, याबाबत गॅस कंपन्यांकडून अद्याप स्पष्ट निर्देश प्राप्त झाले नसल्याची माहिती वितरकां कडून देण्यात येत आहे. अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्याने गॅस सिलिंडरच्या वितरणावर काही निर्बंध लागू करण्यात आले होते. त्याच काळात नवीन घरगुती गॅस कनेक्शन देण्याची प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली होती; मात्र सहा महिन्यांनंतरही ही प्रक्रिया पूर्ववत झालेली नाही.त्यामुळे नवीन घरात स्थलांतरित झालेले नागरिक, बाहेरगावी शिक्षणासाठी जाऊन परतलेले विद्यार्थी तसेच स्वतंत्र संसार थाटणाऱ्या कुटुंबांना नवीन गॅस जोडणीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.व्यावसायिक गॅस सिलिंडर वरील निर्बंध हटविण्यात आले असले तरी नवीन घरगुती गॅस कनेक्शन देण्याची प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाही. कंपन्यांकडून निर्देश प्राप्त होताच नवीन जोडणी सुरू करण्यात येईल, असे एजन्सीकडून सांगण्यात येत आहे.

### तात्पुरता ५ किलोचा छोटा सिलिंडर

» अत्यावश्यक गरज असलेल्यांसाठी तात्पुरता पर्याय म्हणून पाच किलोचा छोटा एलपीजी सिलिंडर उपलब्ध करून दिला जात आहे. आधार क्रमांकाच्या आधारे हा सिलिंडर खरेदी करता येतो. तसेच ज्या गॅस एजन्सीकडून तो घेतला आहे, त्याच एजन्सीकडून त्याचे रिफिलिंग करून मिळत असल्याची माहिती आहे.

### एकच सिलिंडर असलेल्या ग्राहकांची गैरसोय

» गॅस सिलिंडर बुकिंगसाठी २५ दिवसांचा नियम अद्याप कायम असल्याने एकच सिलिंडर असलेल्या ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे. पहिला सिलिंडर २५ दिवसांच्या आत संपल्यास दुसरा सिलिंडर तत्काळ मिळत नसल्याने ग्राहकांना बुकिंगची मुदत पूर्ण होण्याची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे उर्वरित दिवस स्वयंपाक कसा करायचा, असा प्रश्न गृहिणींसमोर आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरूवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# अमानी नजीक कारचा भीषण अपघात 4 जखमी, दोघांची प्रकृती चिंताजनक

## अपघातानंतर कारमधून सीएनजी गॅस ची गळती,घटनास्थळी अग्नीशमन दाखल





प्रतिनिधी १३ ऑगस्ट

अकोला :वाशिमच्या ते मालेगाव मार्गावर भरधाव कारचा भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत चार जण गंभीर जखमी झाले असून दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. सर्व जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.या अपघातामूळे परिसरात एकच खळबळ उडाली होती.

वाशिम-मालेगाव मार्गावर अमानीजवळ आज भीषण अपघाताची घटना घडली. भरधाव वेगाने जाणाऱ्या एका कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यावरील डिव्हायडरला जोरदार धडकली. या भीषण अपघातात चार जण गंभीर जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. कारमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढून रुग्णवाहिका वेळेवर न आल्याने पोलीस वाहनातुनच पोलीसांच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींपैकी काहींवर वाशिम येथे तर काहींवर मालेगाव येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर कारमधील सीएनजी गॅसची गळती सुरू झाल्याने संभाव्य धोका लक्षात घेऊन अग्निशमन दलालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. या अपघातात कारचा अक्षरशः चुराडा झाला असून काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

# येलो अलर्ट नंतरही जिल्ह्यात पडेना पाऊस

## जिल्ह्यात 20 टक्क्यांची घट

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



**अकोला :** हवामान विभागाने 16 ऑगस्ट पर्यंत जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. काल बुधवारी रिमझिम पावसाने हजेरी लावल्यानंतर आज गुरुवारी परत ऊन पडल्याने तसेच शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा धरण परिसरात मुसळधार पाऊस न झाल्याने सध्याही धरणातील पाणी साठ्याची स्थिती चिंताजनकच आहे. सद्यस्थितीत धरणात 25% पाणीसाठा शिल्लक आहे

जुलैच्या शेवटच्या दिवसांत दमदार पावसाने दिलासा दिल्यानंतर ऑगस्टच्या सुरुवातीपासून मान्सून पुन्हा एकदा गायब झाला आहे. गेल्या १२ दिवसांपासून विदर्भात पावसाचा मोठा खंड पडल्याने पावसाची तूट वाढू लागली आहे. ऐन खरिपातील पिकांच्या वाढीच्या काळात पाऊस गायब झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असून, बळीराजाचे डोळे आता आकाशाकडे लागले आहेत.

जुलै अखेर झालेल्या समाधानकारक पावसामुळे अकोला जिल्ह्यातील पावसाची तूट काही प्रमाणात भरून निघाली होती. मात्र, ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात पावसाने ओढ दिल्याने परिस्थिती पुन्हा चिंताजनक बनली आहे. १ जून ते १२ ऑगस्टदरम्यान अकोला जिल्ह्यात ४८३ मि.मी. पावसाची नोंद झाली असून, सरासरी ६१०.६ मि.मी.च्या तुलनेत तब्बल 20 टक्के तूट आहे. जिल्ह्याची एकूण पर्जन्यमान तूट 20 टक्क्यांवर पोहोचली आहे.

### खरिपाच्या पिकांवर होईल परिणाम

पावसाच्या प्रदीर्घ खंडाचा परिणाम पिकांवर होण्याची भीती आहे. पिकांना सध्या वाढी साठी पाण्याची गरज असताना पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पुढील काही दिवसांत मान्सूनन सक्रिय होण्याचा अंदाज असला तरी प्रत्यक्षात पाऊस कधी बरसणार याकडे शेतकऱ्यांसह सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# तुकाराम मुंढे साहेब, एकदा बुलढाण्यात या!

## 75 वर्षीय आजींची विनंती, सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल

प्रतिनिधी १३ ऑगस्ट



बुलडाणा : सध्या आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची संपूर्ण राज्यासह देशभर चर्चा आहे. राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसालाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम राबवत आहे. अन्न व औषध प्रशासनानेचे आयुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यभरातील धडाकेबाज कारवायांनी अन्न माफियांवर मोठा आळा बसला आहे. याचदरम्यान, बुलढाण्यातील एका आजीने सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट करत एक आवाहन केलं आहे. बुलढाण्यात अनेक फळ आणि खाद्यपदार्थात भेसळ होत असून येथील अधिकारी कुठलीही कारवाई करत नाहीत. त्यामुळे तुकाराम मुंढे साहेब तुम्ही एकदा बुलढाणा आणि खामगावचा दौरा करा, अशी साद घालत बुलढाण्यातील एका ७५ वर्षीय आजीने सोशल मीडियाच्या माध्यमातून विनंती केली आहे. सध्या या आजींचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. तुकाराम मुंढे साहेब...तुम्ही एकदा बुलढाणा जिल्ह्यात या..आणि भेट देऊन जावा...बुलढाणा जिल्ह्यातील साहेब लोक पैसे खातात आणि काहीच कारवाई करत नाही. सरकारी दवाखान्यात देखील मोठा घोटाळा सुरु आहे. कुणीच काही करत नाही. त्यामुळे तुम्ही एकदा बुलढाण्यात या, माझी एवढीच विनंती आहे, असं आजी एका व्हिडीओमध्ये बोलत आहे. तर दुसऱ्या व्हिडीओमध्ये तुकाराम मुंढे साहेब...बुलढाणा जिल्ह्यातील खामगावमध्ये या...इकडे खूप भेसळ सुरु आहे. दुकानातील तेलामध्ये, केळीमध्ये-पपईमध्ये औषध टाकण्यात येत आहे. यावर इकडचे अधिकारी काहीच कारवाई करत नाही, पैसे खातात, असा दावा आजीने केला आहे.

## सूर्य गार्डनमधील अपार्टमेंटचे पाणी थेट मोकळ्या जागेत!

**अकोला :** शहरातील खडकी परिसरातील सूर्य गार्डन येथे अपार्टमेंटमधून सोडण्यात येणारे सांडपाणी थेट मोकळ्या जागेत साचत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. साचलेल्या पाण्यामुळे मच्छरांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव होत असून, परिसरात सापांचाही वावर वाढल्याची नागरिकांची तक्रार आहे. विशेष म्हणजे याबाबत महानगरपालिकेकडे तक्रार करूनही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

# अकोला-बाळापूर महामार्गावर भीषण अपघात महिलेचा मृत्यू, एक जण जखमी

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोला :** अकोला-बाळापूर महामार्गावर झालेल्या भीषण रस्ता अपघातात दोन जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातानंतर जखमी महिलेला तातडीने अकोला येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर तिला मृत घोषित केले. अपघातातील दुसऱ्या



जखमी व्यक्तीवर उपचार सुरू असल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, आवश्यक पंचनामा व कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, तसेच मृत महिला आणि जखमी व्यक्तीची ओळख याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

या दुर्घटनेमुळे अकोला-बालापूर महामार्गावर काही काळ वाहतूक आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

# भिमनगरमध्ये विजेचा जबर शॉक लागून युवकाचा मृत्यू

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोला :** अकोल्याच्या जुने शहरातील भिम नगर परिसरात विजेचा जबर शॉक लागून आदित्य उर्फ लाल्या अंभोरे या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. आज सकाळी आठ वाजताच्या दरम्यान बाथरूममध्ये जात असताना अचानक आदित्यला विजेचा धक्का बसला आणि तो जमिनीवर कोसळला. यावेळी त्याने जोरात आरडाओरड केल्याने शेजारील नागरिकांनी तातडीने धाव घेत दरवाजा तोडून आत प्रवेश केला. नागरिकांनी तत्काळ वीजपुरवठा खंडित करून आदित्यला बाहेर काढले. त्यानंतर त्याला उपचारासाठी अकोल्याच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात



आले. मात्र, डॉक्टरांनी उपचार सुरू करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. आदित्य हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता.

कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी अशी मागणी होत असून त्याच्या अकाली निधनाने भिम नगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मूर्तिजापूरच्या विकासासाठी 'उपमुख्यमंत्री दरबारात' लखन अरोरा; शिंदे भेटीने राजकीय चर्चांना उधाण

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** शहराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळावी, शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागावेत आणि नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने नगरपरिषदेचे माजी उपाध्यक्ष लखन अरोरा यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीत मूर्तिजापूर शहरातील विविध विकासकामे, नागरी समस्या तसेच भविष्यातील विकासाच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे.

लखन अरोरा यांच्या या भेटीमुळे मूर्तिजापूरच्या राजकीय वर्तुळात चर्चांना चांगलेच उधाण आले आहे. आगामी काळात



स्थानिक राजकारणात काही नवीन राजकीय समीकरणे आकार घेण्याची शक्यता व्यक्त होत असून, काही नगरसेवक शिवसेनेच्या शिंदे गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अरोरा यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी झालेली भेट राजकीयदृष्ट्याही महत्त्वाची मानली जात आहे.

विशेष म्हणजे, शिवसेना शिंदे गटाच्या माध्यमातून झालेल्या निवडणुकीत लखन अरोरा यांच्या भगिनी नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. तसेच नगरसेवक गंपू शर्मा यांच्यासोबत प्रभागातील स्वच्छता, नागरी सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्यांकडे लक्ष देण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले जाते. प्रभागातील प्रश्न केवळ मांडण्याऐवजी ते प्रत्यक्ष मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यावर भर दिला जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. मात्र, प्रभागापुरता विकास मर्यादित न राहता संपूर्ण मूर्तिजापूर शहराचा कायापालट व्हावा, शहराला आधुनिक नागरी सुविधांची जोड मिळावी आणि विकासकामांना व्यापक स्वरूप प्राप्त व्हावे, या उद्देशाने लखन अरोरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर शहरातील विविध प्रश्नांची 'कैफियत' मांडल्याची चर्चा आहे. त्यामुळे ही भेट केवळ सदिच्छा भेट न राहता शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकते, असे राजकीय जाणकारांचे मत व्यक्त होत आहे. दरम्यान, अरोरा यांच्या या सक्रिय भूमिकेमुळे त्यांच्याकडे आगामी स्थानिक राजकारणातील संभाव्य 'गेम चेंजर' म्हणून पाहिले जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# सर्व पेट्रोल पंपांवरील ईव्हीचार्जिंग मशीन तात्काळ सुरु करा!

## माजी आमदार विप्लव बाजोरिया यांची मागणी

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोला :** इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याचे सरकारचे धोरण पर्यावरणपूरक असूनही ग्रामीण भागात चार्जिंग मशीन जाळे अतिशय मंदगतीने उभारले जात आहेत. ज्या पेट्रोल पंपावर अशा यंत्रणा उभारल्या आहेत, त्या तात्काळ सुरु करा, अशी मागणी माजी आमदार विप्लव बाजोरिया यांनी केली आहे. महाराष्ट्रात इंडीयन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम यांच्या असंख्य पेट्रोल पंपांवर मागील दोन वर्षापासून इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग मशीन बसविण्यात आल्या आहेत. मात्र अद्यापही यातील अनेक ठिकाणी या मशीन सुरुच नाहीत. यामुळे विद्युत वाहनांचा वापर करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. केंद्र सरकारने देशभरात चार्जिंग सुविधा वाढविण्यासाठी हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. रष्ट्रीय महामार्गासह शहरांतील पेट्रोल पंपांवर चार्जिंग स्टेशन उभारण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. तरीही जमिनीवर अंमलबजावणीत झालेला विलेब हा धोरण आणि प्रत्यक्ष कृतीतील अंतर दर्शवतो. केंद्र सरकार, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, अवजड उद्योग मंत्रालय तसेच विविध पेट्रोल वितरण



दोन वर्षापूर्वी बसविलेल्या चार्जिंग मशीन आजही सुरू नसणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. सरकार इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देत असल्याचे सांगते, मात्र प्रत्यक्षात पायाभूत सुविधा वेळेवर उपलब्ध करुन दिली जात नाही. लांबचा प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना चार्जिंगची चिंता सतत भासत असते. या मशीन तात्काळ सुरू झाल्यास जनतेची मोठी सोय होईल आणि प्रवास शांततेत, सुरक्षित व सुखकर होईल.

**विप्लव बाजोरिया, माजी आमदार**

कंपन्यांनी महाराष्ट्रातील सर्व बसविलेल्या चार्जिंग स्टेशनची स्थिती सार्वजनिक करावी आणि ठराविक कालमर्यादेत ती सुरू करण्याची हमी द्यावी, अशी मागणी बाजोरिया यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. प्रत्येक पंपावर चार्जिंग स्टेशन कार्यान्वित होण्याची निश्चित तारीख जाहीर करावी. तांत्रिक व प्रशासकीय अडथळे त्वरित दूर करून जनतेला पारदर्शक माहिती आणि संपर्क यंत्रणा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी बाजोरिया यांनी केली आहे.

### विलंबाची संभाव्य कारणे

»वीज जोडणी आणि उच्च क्षमतेच्या वीज पुरवठ्यात विलंब, चार्जिंग मशीनचे कमिशनिंग आणि सॉफ्टवेअर इंटिग्रेशन काम अधुरे,ऑपरेटर आणि तेल कंपन्यांमधील करार प्रलंबित,मेंटेनन्स, एएमसी अथवा नेटवर्क कनेक्टिव्हिटीच्या, समस्या,वीज वितरण कंपनीकडून अंतिम परवानगी प्रलंबित, ईव्ही वाहनांची संख्या कमी असल्याने व्यावसायिक सुरुवात टाळली जाणे.

# शहरात स्वातंत्र्य दिनाचा उत्साह शिगेला

## देशभक्तीच्या रंगाने न्हाऊन निघणार अकोला शहर

प्रतिनिधी १३ ऑगस्ट

**अकोला:** शहरात स्वातंत्र्य दिनाची तयारी जोरात सुरू असून, हर घर तिरंगा रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक कार्यक्रमांची जोरदार रेलचेल दिसून येत आहे. तिरंग्याचा अभिमान, देशभक्तीचा उत्साह, आणि विविध कार्यक्रमांच्या लगबगीमुळे, पुढील तीन दिवस अकोला शहर आणि जिल्ह्यात देशभक्तीचे वातावरण असेल. शहरातील सुंदराबाई टावर महापालिका तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर तिरंगा रोषणाई करण्यात आली आहे जी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

तिरंगा अभियानाचा एक भाग म्हणून, विविध सरकारी विभाग, महानगरपालिका, शाळा आणि सामाजिक संस्थांनी आयोजित केलेल्या तिरंगा रॅलींची मालिका बुधवारी सुरू झाली. महापालिका आयुक्त सुनील लहाने यांनी दुचाकी रॅलीला हिरवी झेंडी दाखवली. गुरुवार आणि शुक्रवारीही तिरंगा रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातील.

स्वातंत्र्य दिनी, शनिवारी, शहर





आणि जिल्हा देशभक्तीच्या रंगांनी न्हाऊन निघेल.

अकोला रेल्वे स्टेशनवरील उंच ध्वजस्तंभ, तसेच शनिवारी शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहण प्रत्येक शाळांमधील ध्वजारोहण महापालिकेतील ध्वजारोहण आधी कार्यक्रमांची रेलचेल पहावयास मिळेल. त्याचबरोबर शहरात काही ठिकाणी तसेच शाळांमध्ये देशभक्तीपर आधारित गीतांचे कार्यक्रम सुद्धा सादर होतील त्यामुळे एकंदरीतच शहरात सर्वत्र देशभक्तीचे वातावरण पाहावयास मिळत आहे



## अमरावतीत राज्यस्तरीय छायाचित्र महोत्सव!

**अमरावती :** रेवणसिद्ध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संस्था, अमरावती यांच्या वतीने तसेच गेल इंडिया लिमिटेडच्या प्रायोजकत्वाखाली १८ ते २० ऑगस्ट २०२६ दरम्यान राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील व्यावसायिक आणि हौशी छायाचित्रकार मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी होत आहेत.

१८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता आमदार प्रवीणभाऊ पोटे पाटील यांच्या हस्ते छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन होणार आहे. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार असून, यशस्वी महिला उद्योजिकांचा सत्कारही करण्यात येणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135